## नेमणे आहे

नामवंत दै. 'जनता आवाज' वृत्तपत्रासाठी तसेच न्यूज चॅनलकरिता प्रतिनिधी नेमणे आहेत.

१) अहिल्यानगर
२) पुणे
३) नाशिक
४) छत्रपती संभाजीनगर
५) बीड
संपर्क:- ८८९६७११७११

jantaawajnews@gmail.com

दैनिक
# जनता आवाज

साई समर्थ सिमेंट प्रॉडक्टस्
पाईप कंपनी ६ इंच ते ६ फुटापर्यंत सिमेंट पाईप (As Per ISI) योग्य दरात उपलब्ध.
सिमेंट पाईप | सेफ्टिक टँक | वॉटर टँक | गव्हाणी,ढापे | सिमेंट पोल
सतिष उत्तमराव खर्डे पा. 9552749534 | अमोल सिताराम थोरात पा. 9764626533 | ज्ञानेश्वर रघुनाथ खर्डे पा. मा.उपसरपंच,को.बु||
राजुरी रोड,श्री स्वामी समर्थ केंद्राच्या पुढे,कोल्हार बु|| 9765481334

अहिल्यानगर | वर्ष ०२ रे | अंक १५० | रविवार, दि. २७ जुलै २०२५ | PRGI No. MHMAR/25/RAA11 | पाने ०८ | किंमत ४ रुपये

# मोदी 'शो' नाही तर 'विकासाचा रोड शो'

## मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा राहुल गांधींवर पलटवार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई : राहुल गांधी यांची टीका म्हणजे राजकीय अपरिपक्वतेचे, नैराश्याचे आणि त्यांच्या अपयशाचे जिवंत उदाहरण असल्याचे भाजपचे नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणजे मोदी 'शो' नाही तर 'विकासाचा रोड शो' असल्याचा दावा देखील त्यांनी केला आहे. राहुल गांधी यांनी मोदींवर टीका करत त्यांच्यासाठी गुब्बारा शब्द वापरला होता. यावरुन बावनकुळे यांनी पलटवार केला आहे.**

या संदर्भात मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी एका पोस्टच्या माध्यमातून राहुल गांधी यांच्यावर टीका केली आहे. यामध्ये त्यांनी म्हटले की, जनतेने निवडणुकीत १० वेळा तुमच्या पक्षाचा 'हवेचा फुगा' फोडला असल्याचे बावनकुळे यांनी म्हटले आहे. देशाच्या १४० कोटी जनतेनं सलग तिसऱ्यांदा मोदीजींवर विश्वास ठेवला, पूर्ण बहुमत दिलंय. त्या नेत्याबद्दल अशी भाषा वापरणं म्हणजे लोकशाहीचा, जनतेचा अपमान असल्याचा आरोप देखील बावनकुळे यांनी केला आहे.

राहुल गांधी यांनी कायम लक्षात ठेवायला हवे की, आदरणीय मोदीजी 'शो' नाहीत, ते 'विकासाचा रोड शो' आहेत. मोदीजी म्हणजे दिशा तर राहुल गांधी म्हणजे दिशाभूल हे देशातील जनतेने ओळखले आहे. तुम्ही आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्यासाठी गुब्बारा हा शब्द वापरताय; पण जनतेने निवडणुकीत १० वेळा तुमच्या पक्षाचा हवेचा फुगा फोडला आहे.

राहुल गांधी, हा देश तुमच्या भाषणांवर चालत नाही. तो आकड्यांवर, कामांवर आणि जनतेच्या विश्वासावर चालतो. पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या ११ वर्षांच्या कार्यकाळात भारताने विकासाच्या प्रत्येक क्षेत्रात भक्कम झेप घेतली आहे. देशातील तब्बल २५ कोटी लोकांना गरिबीच्या रेषेतून वर काढण्यात यश मिळालं आहे. केंद्रातील मोदी सरकारने ८० कोटींहून अधिक नागरिकांना मोफत अन्नधान्य उपलब्ध करून दिलं. आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताची मान उंचावली. ही फक्त आकडेवारी नाही, तर कोट्यवधी कुटुंबांच्या आयुष्यात घडलेली क्रांती आहे.

बावनकुळे म्हणाले की, राहुलजी आकड्याचं अर्धवट वाचन करून देशाला गोंधळात टाकण्याचा प्रयत्न करून नका.



देशाच्या १४० कोटी जनतेनं सलग तिसऱ्यांदा मोदीजींवर विश्वास ठेवला, पूर्ण बहुमत दिले. त्या नेत्याबद्दल अशी भाषा वापरणे म्हणजे लोकशाहीचा, जनतेचा अपमान आहे. राहुल गांधी, तुमची टीका म्हणजे राजकीय अपरिपक्वतेचं, नैराश्याचं आणि त्यांच्या अपयशाचं जिवंत उदाहरण आहे.
**– चंद्रशेखर बावनकुळे, महसूल मंत्री**

स्वतःचे अपयश लपविण्यासाठी दुसऱ्यांना दोष देण्यापेक्षा आत्मपरिक्षण करा. महाराष्ट्रातील जनतेने तुम्हाला नाकारले आहे. आता बिहारमधील जनताही तुम्हाला हद्दपार करणार आहे. त्याच भीतीतून तुम्ही आतापासून पराभवाचे कारण देत आहात.

आमच्या महायुतीला जनतेने निवडून दिले आहे. जनतेने आमच्यावर दाखविलेला हा विश्वास आहे. तो पुढील निवडणुकीतही असाच अभंग राहील. तुम्ही खोटे बोलून राज्यातील जनादेशाचा अपमान करीत आहात.

# कोकाटे आऊट आणि मुंडे इन?

## सुषमा अंधारेंची पोस्ट; धनंजय मुंडे पुन्हा मंत्री होणार?

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई** : शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील मंत्रिमंडळात पुन्हा एकदा सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे मंत्री धनंजय मुंडे यांची वर्णी लागण्याची शक्यता व्यक्त केली आहे. त्यांनी शनिवारी कोकाटे आऊट आणि मुंडे इन अशा आशयाची पोस्ट केल्यामुळे या चर्चेला सुरूवात झाली आहे. हे खरे ठरले तर पुढील तीन दिवसांत माणिकराव कोकाटे यांचा राजीनामा निश्चित मानला जात आहे.

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची ९ डिसेंबर २०२४ रोजी निर्घृण हत्या करण्यात आली. या हत्येशी संबंधित खंडणी प्रकरणात वाल्मीक कराडला अटक करण्यात आली. वाल्मीक कराड हा धनंजय मुंडेंचा निकटवर्तीय असल्यामुळे विरोधकांनी मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी केली. पण महायुती सरकारने शेवटपर्यंत चालढकल केली.



अखेर देशमुख यांच्या निर्घृण हत्येचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले आणि सरकारचा नाईलाज झाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी धनंजय मुंडे यांचा राजीनामा मागितला व मुंडेंना तो तत्काळ द्यावा लागला. मुंडेंवर कृषि साहित्य खरेदी प्रकरणात घोटाळा केल्याचाही आरोप होता.

पण हायकोर्टाने या प्रकरणी त्यांना क्लीनचिट दिल्यामुळे आता पुन्हा त्यांचा राज्य मंत्रिमंडळात प्रवेश होणार असल्याचा दावा केला जात आहे. शिवसेना ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी शनिवारी सकाळी एक पोस्ट करून या चर्चेला हवा दिली. त्यांनी आपल्या पोस्टमध्ये कोकाटे आऊट... मुंडे इन असे ४ शब्द लिहिले. त्याच्यासोबत अजितपर्व असा उल्लेखही केला.

सुषमा अंधारे यांच्या या पोस्टमुळे माणिकराव कोकाटे यांचा राजीनामा निश्चित झाल्याचे मानले जात आहे. विशेषतः धनंजय मुंडे यांच्यासाठी मंत्रिमंडळाची कवाडे खुली होणार असल्याचे संकेतही यातून मिळत आहेत.

राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांनी अखेर आपल्या पदाचा राजीनामा दिला. ते बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याकांडामुळे अडचणीत सापडले होते. विरोधकांनी सातत्याने त्यांच्या राजीनाम्याची मागणी लावून धरली होती. अखेर सोमवारी संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले आणि अवघा महाराष्ट्र अस्वस्थ झाला. यामुळे सरकारवरील दबाव वाढल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यापुढे धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेतल्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय उरला नाही. अखेर त्यांनी राजीनामा मागितला आणि धनंजय मुंडे यांनी तो लागलीच दिला.

## संमिश्र

### मध्य प्रदेश–उत्तर प्रदेश महामार्ग बंद

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नवी दिल्ली** : हवामान खात्याने शनिवारी मध्य प्रदेश, छत्तीसगड, महाराष्ट्र आणि गोव्यात पावसाचा रेड अलर्ट जारी केला आहे. याशिवाय पूर्व आणि दक्षिणेकडील १३ राज्यांमध्ये ऑरेंज अलर्ट आहे. बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्यामुळे शनिवारी बंगालच्या दक्षिणेकडील जिल्ह्यांमध्ये मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

### बिहारमध्ये ६४ लाख मतदारांची नावे यादीतून वगळणार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाटणा:** बिहारच्या मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरावलोकनाचा (एसआयआर) पहिला टप्पा शुक्रवारी पूर्ण झाला. आतापर्यंत २२ लाख मृत आणि ७ लाख डुप्लिकेट मतदारांची ओळख पटली आहे, असे निवडणूक आयोगाने सांगितले.




आमच्या सर्व आशा पाण्यात बुडाल्या।

# ठाकरेंचे आमदार-खासदार भाजपच्या संपर्कात

## मंत्री गिरीश महाजन यांचा दावा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पंढरपूर** : उद्धव ठाकरेंचे अनेक आमदार आणि खासदार भाजपच्या संपर्कात असल्याचा दावा भाजप नेते आणि मंत्री गिरीश महाजन यांनी केला आहे. केवळ तांत्रिक कारणांमुळे ते ठाकरे गटात असल्याचेही गिरीश महाजन यांनी म्हटले आहे.

### हॅनी ट्रॅप विषय माझ्यासाठी संपला

दरम्यान, काही दिवसांपूर्वी चर्चेत आलेल्या हनी ट्रॅप प्रकरणावरही त्यांनी भूमिका स्पष्ट केली. हा विषय माझ्यासाठी आता संपला आहे, असे सांगून मंत्री गिरीश महाजन यांनी यावर बोलण्यास नकार दिला.

त्यांच्या या वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ माजली आहे.

राज्यात एकीकडे मंत्रिमंडळात फेरबदल होण्याची चर्चा सुरू असताना गिरीश महाजन यांनी केलेल्या खळबळजनक दाव्याने राज्यात पुन्हा राजकीय भूकंप होणार असल्याची चर्चा सुरू झाली



असून, ठाकरे गट पुन्हा फुटीच्या उंबरठ्यावर आहे का, असा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे. मंत्री गरीश महाजन आज पंढरपूरच्या दौऱ्यावर आहेत. शनिवारी सकाळी महाजन यांनी विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले. त्यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना उपरोक्त दावा केला आहे.

काँग्रेससह सर्वच पक्षांचे लोक भाजपमध्ये यायला तयार आहेत. विशेषतः ठाकरे गटाचे अनेक आमदार आणि खासदार भाजपच्या संपर्कात आहेत. पण काही तांत्रिक कारणांमुळे ते अजूनही ठाकरे गटातच आहेत. मात्र,

पान ४

# राज ठाकरेंची महापालिकेसाठी मोर्चेबांधणी

## आठ नव्या शिलेदारांची निवड, मनसेचा आजचा मेळावा रद्द

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई** : मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मुंबई महापालिकेसाठी जोरदार मोर्चेबांधणी करण्यास सुरूवात केली आहे. या प्रकरणी काल, शनिवारी त्यांनी आपल्या पक्षाच्या ८ नव्या पदाधिकाऱ्यांची निवड केली. या नव्या दमाच्या पदाधिकाऱ्याच्या जोरावर राज मुंबई महापालिकेतील आपली ताकद वाढवण्याचा प्रयत्न करणार आहेत. दरम्यान, मनसेचे मुंबई शहराध्यक्ष संदीप देशपांडे यांनी मराठीच्या मुद्यावर मनसेवर केलेली टीका धुडकावून लावली आहे. मला फक्त चितळ्यांची भाकरवडी माहिती आहे, असे ते म्हणालेत.

राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीची लवकरच निवडणूक होण्याची शक्यता आहे. यात मुंबई महापालिकेच्या निवडणुकीचाही समावेश आहे. या पार्श्वभूमीवर राज ठाकरे यांनी शनिवारी मुंबईतील ८ नव्या विभागप्रमुखांच्या नावावर शिक्कामोर्तब केले. यात गुजराती व उत्तर भारतीयांचे प्राबल्य असणाऱ्या



कांदिवली पूर्व विधानसभा विभाग अध्यक्ष म्हणून महेश फारकसे, जोगेश्वरी विधानसभा विभाग अध्यक्षपदी दीपक आर्य, दहिसर विधानसभा विभाग अध्यक्षपदी पांडुरंग राणे, बोरिवली विधानसभा अध्यक्षपदी विश्वास मोरे याची नियुक्ती करण्यात आली आहे.

याशिवाय कुर्ला विधानसभा विभाग अध्यक्षपदी प्रदीप वाघमारे, अणुशक्ती नगर विधानसभा अध्यक्षपदी रवींद्र शेलार, भांडुप विधानसभा विभाग अध्यक्षपदी अनिल पंडित राजभोज व मलबार हिल विधानसभा विधाग अध्यक्षपदी दिनेश पुंडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राज ठाकरे यांनी काही दिवसांपूर्वी पक्षाच्या केंद्रीय समितीला अकार्यक्षम पदाधिकाऱ्यांच्या जागी नव्या कार्यकर्त्यांची निवड करण्याची सूचना केली होती. त्यानुसार या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत.

# ... तर तुला शंभर टक्के लाभ मिळेल

## तरुणाने नोकरी मागताच अजित पवारांकडून प्रत्युत्तर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पुणे** : नेहमीच ठाम, थेट आणि वेगवान कामशैलीसाठी प्रसिद्ध असलेले उपमुख्यमंत्री अजित पवार पुन्हा एकदा त्यांच्या शैलीमुळे चर्चेत आले आहेत. एका पत्रकार परिषदेदरम्यान एका व्यक्तीने थेट सरकारी नोकरीची मागणी केल्याने अजित पवार त्या व्यक्तीवर संतापल्याचे पाहायला मिळाले. त्यांनी समोरच्या व्यक्तीला बोलण्याची ही पद्धत नाही, असे म्हणत चांगलेच सुनावले असून, नियमात बसत असेल तर शंभर टक्के लाभ मिळेल, असे आश्वासनही दिले आहे.



हा संपूर्ण प्रकार पुण्यातील एका पत्रकार परिषदेदरम्यान घडला. अजित पवार माध्यम प्रतिनिधींच्या प्रश्नांना उत्तर देत असताना, अचानक एका तरुणाने थेट त्यांच्या पुढे येऊन दादा, मला सरकारी नोकरी द्या अशी मागणी केली. सुरुवातीला पवारांनी संयम राखत, हा मुद्दा क्रीडा विभागाशी संबंधित असल्याने त्या व्यक्तीने राज्याचे क्रीडा मंत्री दत्ता भरणे यांची भेट घ्यावी, असा सल्ला तरुणाला दिला.

### ते पैसे वसूल करणार : पवार

उपमुख्यमंत्री अजित पवारांनी लाडकी बहीण योजनेबद्दलही महत्त्वपूर्ण माहिती दिली. ज्या पुरुषांनी या योजनेचा गैरवापर करून लाभ घेतला आहे, त्यांच्याकडून पैसे वसूल करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# खडसेंचे मंत्री गिरीश महाजनांना आव्हान

**जनता आवाज वृत्तसेवा**



**जळगाव** : स्वतःच्या प्रॉपर्टीची चौकशी लावा, माझ्या मुलाची मृत्यूची सीआयडी चौकशी करा आणि प्रफुल्ल लोढा याची नार्को टेस्ट करा, असे आव्हान एकनाथ खडसे यांनी महाजन यांना दिले आहे.

जळगाव जिल्ह्यातील राजकारणात गेल्या काही दिवसांपासून एकनाथ खडसे विरुद्ध गिरीश महाजन असा वाद पाहायला मिळत आहे. या वादाच्या माध्यमातून

पान ४

# राहुरी खुर्दमध्ये गुटखा-मावा विक्रेत्यावर छापा

## साडेपाच लाखांचा मुद्देमाल हस्तगत; एकजण जेरबंद

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी खुर्द** : अवैध गुटखा व मावा उत्पादन करणाऱ्यांवर पोलिसांनी मोठी कारवाई करत सुमारे साडेपाच लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई काल शनिवारी सकाळी जिल्हा पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या विशेष पथकाने राहूरी खुर्द येथील पवन ट्रेडर्स या किराणा दुकानावर छापा टाकून केली. यावेळी पोलिसांनी एका आरोपीला ताब्यात घेतले असून या कारवाईने परिसरातील अवैध व्यवसाय करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

विशेष पोलीस पथकाने पवन ट्रेडर्समध्ये छापा टाकल्यावर मावा तयार करण्यासाठी वापरली जाणारी मशीन, सुपारी, मावा, विमल व गोवा पानमसाला यांसह एकूण सुमारे ५.५ लाख रुपयांचा मुद्देमाल आढळून आला. या प्रकरणात पवण उर्फ पृथ्वीराज दगडूसिंग गिरासे (रा. राहुरी खुर्द) याला अटक करण्यात आली आहे. दरम्यान, या प्रकरणी राहुरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे काम दुपारनंतर सुरू होते.




सदरची कारवाई

पान ४

# सहकार बळकट करा, सरकार तुम्हांला पाठबळ देईल

## पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील; अकोले येथे सोसायटी सचिवांच्या संघटनेचे अधिवेशन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली सहकार मंत्री अमित शहा यांनी जाहीर केलेले राष्ट्रीय सहकार धोरण यशस्वी करण्याचे आव्हान स्विकारून सहकार बळकट करा, सरकार सचिवांना पाठबळ देईल, आशी ग्वाही जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

अकोले येथे स्वाभिमानी

सेवा सहकारी सोसायटीच्या वाटचालीचा इतिहास खूप मोठा आहे. परंतू, ज्या उद्दीष्टांसाठी या संस्थाची सुरूवात ते पूर्ण होवू शकले नाही. आव्हानात्मक परिस्थितीला सामोरे जावून सोसायट्यांचा कारभार सुरू आहे. त्यामुळे संस्थांना उत्पन्नाचे मार्ग उपलब्ध करून देण्याचे धोरण मोदी सरकारचे असून सोसायट्या आता मार्गदर्शक सूचनांप्रमाणे व्यवसाय सुरू शकतील.
**– राधाकृष्ण विखे पाटील, पालकमंत्री**




विविध कार्यकारी सहकारी सेवा सोसायट्यांच्या सचिवांच्या संघटनेचे राज्यस्तरीय अधिवशनाचे उद्घाटन मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आणि सहकार राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. यावेळी ते बोलत होते.

आ. डॉ. किरण लहामटे, आ. अमोल खताळ, आ. सत्यजीत तांबे, जिल्हा बँकेचे व्हा. चेअरमन माधवराव कानवडे, सचिव

पान ४

सहकार मंत्रालयाने क्रांतीकारी निर्णय घेतल्याने चळवळीला मोठा दिलासा मिळाला आहे. राज्याच्या काही भागात सहकारात चांगले काम झाले. विदर्भात मात्र स्वाहाकार झाला. तुम्ही जबाबदारीने काम करता त्यामुळे तुमचे प्रश्न सोडविण्याची जबाबदारी सरकार घेत आहे. मंत्रालयात यासाठी बैठक घेण्यात येणार असून सहकार चळवळीत असलेल्या त्रिस्तरीय रचनेत सोसायट्यांना नव्या सहकार धोरणात प्राधान्य देण्यात आले आहे.
**– डॉ. पंकज भोयर, राज्यमंत्री**

# चक्क गुगल मॅपकडून दिशाभूल?

## कार थेट खाडीत कोसळली; पोलिसांमुळे अनर्थ टळला

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई** : गुगल मॅपवर दाखवलेल्या मार्गावर विश्वास ठेवणं एका महिलेच्या जीवावर बेतण्याची वेळ आली होती. शुक्रवारी (२५ जुलै) पहाटे १ वाजण्याच्या सुमारास बेलापूर परिसरात ही धक्कादायक घटना घडली. उलवेच्या दिशेने जात असलेल्या महिला चालकाने गुगल मॅपवर दाखवलेला सरळ रस्ता स्वीकारला, मात्र त्या रस्त्याचा शेवट थेट ध्रुवतारा जेट्टीकडे जात असल्याने तिची कार थेट खाडीत कोसळली. सुदैवाने, सागरी सुरक्षा पोलिसांनी वेळीच मदत करत तिचा जीव वाचवला.

अपघातग्रस्त महिला कारने उलवेच्या दिशेने जात होती. बेलापूर खाडी पुलाचा मार्ग टाळून गुगल मॅपवर दाखवलेल्या पर्यायी रस्त्याने ती निघाली. मात्र, हा मार्ग जेट्टीवर जाऊन संपतो, हे लक्षात येईपर्यंत उशीर झाला आणि कार थेट खाडीत कोसळली.

घटनास्थळाजवळील गस्त घालणाऱ्या सागरी सुरक्षा

पान ४

# आनंदधाम स्थळ अध्यात्मिक शक्तीचा स्रोत

## आ. संग्राम जगताप; १२६ व्या जन्मोत्सवानिमित्त आ. जगताप यांचे आनंदधाम येथे दर्शन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : आनंदधाम हे स्थळ केवळ समाधी नसून अध्यात्मिक शक्तीचा स्रोत आहे. आचार्य आनंद ऋषीजी म. सा. यांचे कार्य आणि शिकवण ही भविष्यातील पिढ्यांना दिशा देणारी आहे, असे मत आ. संग्राम जगताप यांनी व्यक्त केले.



धर्म, अहिंसा व आत्मविकासाचा संदेश देणारे तपस्वी संत आचार्य श्री आनंद ऋषीजी म. सा. यांच्या १२६ व्या जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त धार्मिक परीक्षा बोर्ड, आनंदधाम येथे भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

याप्रसंगी अहिल्यानगरचे आमदार संग्राम जगताप यांनी आनंदधाम समाधी स्थळाला भेट देऊन आशीर्वाद घेतले. यावेळी आमदार संग्राम जगताप यांनी आचार्य परमपूज्य कुंदन ऋषीजी म. सा. तसेच आचार्य परमपूज्य आलोक ऋषीजी म. सा. यांची प्रत्यक्ष भेट घेत त्यांचे आशिर्वाद प्राप्त केले.

त्यांनी समाधी स्थळावर दर्शन घेत शांततेचा अनुभव घेतला.

कार्यक्रमस्थळी माजी नगरसेवक विपुल शेटिया, सामाजिक कार्यकर्ते राहुल बोरुडे, गणेश दातरंगे, अमित औसरकर यांच्यासह अनेक भक्त-भाविक उपस्थिती होते.

> आचार्य आनंदऋषीजी महाराज यांचे संपूर्ण जीवन हे संयम, समता व सेवाभावाने भरलेले होते. त्यांच्या विचारांमध्ये आजच्या पिढीसाठी दिशा आहे. युवकांनी त्यांचा आदर्श स्वीकारावा, आत्मिक प्रगतीसाठी त्यांचे विचार वाचावेत आणि आचरणात आणावेत. आनंदधाम हे स्थळ केवळ समाधी नसून अध्यात्मिक शक्तीचा स्रोत आहे. आचार्य आनंद ऋषीजी म. सा. यांचे कार्य आणि शिकवण ही भविष्यातील पिढ्यांना दिशा देणारी आहे.
>
> – **संग्राम जगताप, आमदार**

# निखारेंकडून हमीद तकिया ट्रस्ट व दर्गाला भेट



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : सावेडी, प्रेमदान हडको येथील सय्यद हाजी हमीद तकिया ट्रस्ट व दर्गाला पुणे हिंजेवाडी येथील व्यावसायिक जितेंद्र निखारे यांनी भेट दिली.

यावेळी ट्रस्टच्या वतीने सय्यद साबीर अली यांनी निखारे यांचा सत्कार करुन त्यांच्या सामाजिक कार्याचा गौरव केला.

यावेळी सय्यद मेहंदी अली, योगेश, सय्यद जाफर अली आदी उपस्थित होते.

जितेंद्र निखारे हे पुण्यातील नामांकित आयटी कंपनीत प्रिन्सिपल आर्किटेक्चर या पदावर कार्यरत आहेत. गेल्या पाच वर्षापासून ते ट्रस्टशी जोडले आहेत. तर व्यावसायिक कामासोबत ते समाजसेवेत सुद्धा योगदान देत आहे. ते सातत्याने गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत व मार्गदर्शन करत असतात. गेल्या काही वर्षापासून त्यांच्या मार्गदर्शनाने भरपूर विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत मिळाली असल्याचे स्पष्ट करुन त्यांचा सामाजिक कार्याचे सय्यद साबीर अली यांनी कौतुक केले.

> जितेंद्र निखारे यांनी सांगितले की, सय्यद हाजी हमीद तकिया ट्रस्ट व दर्गाला भेट देऊन मानसिक समाधान मिळते. तसेच ट्रस्टच्या माध्यमातून चांगले लोक जोडले गेले असून, नगर शहरात देखील गरजू विद्यार्थ्यांसाठी उपक्रम राबविण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.

# स्पर्धेत टिकण्यासाठी कौशल्य आत्मसात करा

## दादाभाऊ गुंजाळ; महिलांसाठी घेण्यात आलेल्या विविध स्पर्धेचे बक्षिस वितरण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : महिलांनी व्यावसायिक कौशल्य आत्मसात केल्यास स्वतःच्या पायावर उभे राहता येणार आहे. स्पर्धेत टिकण्यासाठी नवीन तंत्रज्ञान व कौशल्य आत्मसात करुन स्वत:ला अपडेट करावे लागणार आहे. महिला व युवतींनी ध्येय निश्चित करुन त्या दिशेने वाटचाल करण्याचे आवाहन उपमुख्य कार्यकारी अधिकारी दादाभाऊ गुंजाळ यांनी केले.



कौशल्य विकास व उद्योजक मंत्रालय संचलित जन शिक्षण संस्थेत व्यवस्थापकी कमिटी सदस्यांची बैठक पार पडली. यावेळी युवा कौशल्य सप्ताहानिमित्त महिलांसाठी घेण्यात आलेल्या विविध स्पर्धे चे बक्षिस वितरण पार पडले. याप्रसंगी ते बोलत होते.

संस्थेचे चेअरपर्सन उषाताई गुंजाळ यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीप्रसंगी दादाभाऊ गुंजाळ, सहाय्यक आयुक्त रवीकुमार पंतम, बाळासाहेब पवार, विजय इंगळे, काशिनाथ गुंजाळ, पूजा देशमुख, अनघा बंदिष्टी, खलील हवालदार, ज्योती पगारे, प्राचार्या डॉ. अनुश्री खैरे, शुभदा पाठक आदी उपस्थित होते.

या बैठकीत महिला, युवक-युवतींसाठी कौशल्य विकास व उद्योजक मंत्रालयाच्या माध्यमातून सुरु असलेल्या विविध व्यावसायिक प्रशिक्षणाचा आढावा घेण्यात आला. तसेच उषाताई गुंजाळ, प्राचार्या डॉ. अनुश्री खैरे व काशीनाथ गुंजाळ यांनी शहरातील विविध प्रशिक्षण केंद्रांना भेटी देऊन महिला व युवतींशी संवाद साधला.

> समाजातील महिला व युवतींना आत्मनिर्भर करण्याचे कार्य जन शिक्षण संस्था करत आहे. यासाठी महिलांना व्यावसायिक प्रशिक्षण देऊन त्यांना पायावर उभे करण्याचे काम सुरु आहे. युवक-युवतींमध्ये कौशल्यक्षम शिक्षण निर्माण करून सक्षम भारत घडणार आहे. संस्थेच्या माध्यमातून जिल्ह्यात ४० हजार पेक्षा अधिक महिला, युवती व युवकांना व्यावसायिक प्रशिक्षण देऊन त्यांना स्वतःच्या पायावर उभे करण्याचे काम करण्यात आले आहे.
>
> – **बाळासाहेब पवार**

# लक्ष्मीआई यात्रेत पोतराजांच्या नृत्याने वेधले नगरकरांचे लक्ष

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : शहरातील रामवाडी येथे लक्ष्मीआई यात्रा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी पोतराजांच्या नृत्याने नागरिकांचे लक्ष वेधले होते.



रामवाडी यात्रा उत्सव कमिटीच्या वतीने विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. रामवाडी परिसरातून शोभायात्रा काढण्यात आली. यामध्ये पारंपारिक वाद्यांच्या गजरात पोतराजसह भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

उंट, कलशधारी महिला, पोतराज व घोड्यांच्या बग्गीत असलेल्या लक्ष्मीमातेच्या मुर्तीने सर्वांचे लक्ष वेधले. भंडाऱ्याची उधळण करीत भाविकांनी लक्ष्मीमातेचा जयघोष केला.

या यात्रेला ५० वर्षाची परंपरा असून, दरवर्षी लक्ष्मीआई यात्रा मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. युवकांनी प्रवरा संगम येथून कावडीने आणलेल्या जलने रामवाडी येथील लक्ष्मी मातेच्या मूर्तीला अभिषेक घालण्यात आला.

पारंपारिक वाद्यांनी संपूर्ण परिसर दणाणून निघाला. या शोभायात्रेत परिसरातील महिला डोक्यावर कलश, कपाळी गंध लाऊन तर भाविक मोठ्या संख्यने सहभागी झाले होते. ही शोभायात्रा कोठला, मंगलगेट, सर्जेपूरा, रंगभवन येथून मार्गक्रमण होऊन रामवाडी येथे तिचा समारोप झाला.

### देवीला अभिवादन करुन यात्रेत झाले सहभागी

आसूड ओढताना चट्ट...चट्ट... हा एकच आवाज परिसरात घुमला. या यात्रेनिमित्त माजी नगरसेवक भाऊसाहेब उडाणशिवे वर्षातून एकदा पोतराजचा साज चढवून देवीला अभिवादन करुन या यात्रेत सहभागी होत असतात. त्यांच्या मार्गदर्शनाखाली पोतराज म्हणून बबन लोखंडे, लखन लोखंडे, ऋतिक शेलकर, पवन शेलकर, वाजंत्री म्हणून विशाल वैरागर, शाम साबळे, यादव खुडे मिरवणूकीत सहभागी झाले होते.

# जप्त केलेल्या वाहनांचा लिलाव

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : जप्त केलेल्या वाहनांचा लिलाव २९ जुलै रोजी सकाळी ११ वाजता तहसील कार्यालय, कोपरगाव येथे आयोजन करण्यात आले आहे. इच्छुक व्यक्ती, संस्थांनी लिलावात सहभाग नोंदवण्याचे आवाहन तहसीलदार, कोपरगाव यांनी केले आहे. तालुक्यात वाळू चोरी विरोधी पथकांनी गोदावरी पात्रातून अवैधरित्या गौणखनिजाचे उत्खनन करुन वाहतूक करत असताना जप्त केलेल्या वाहन मालकांविरुद्ध कार्यवाहीचे आदेश पारित करण्यात आले होते. परंतू वाहन मालकांनी दंडातील रक्कम शासन जमा न केल्याने या वाहन लिलावातून दंडात्मक रक्कम वसून करण्यात येणार आहे. लिलावातील अटी व शर्ती, लिलावात असलेली वाहने, लिलावात हातची किंमत आदीबाबत तहसीलदार, कोपरगाव यांच्याशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असेही कळविण्यात आले आहे.

# स्विमिंग व पॉवर लिफ्टिंग स्पर्धेसाठी खेळाडू रवाना



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : स्पेशल ऑलिम्पिक भारत-महाराष्ट्र आयोजित स्टेट सिलेक्शन चॅम्पियनशिप स्विमिंग व पॉवर लिफ्टिंग स्पर्धेसाठी जिल्ह्यातील पाच दिव्यांग खेळाडूंची निवड करण्यात आली आहे. ही स्पर्धा बाल कल्याण संस्था पुणे येथे होत असून, पोहण्याची निवड चाचणी एस. पी. कॉलेज टिळक रोड येथे होणार आहे. या स्पर्धेसाठी शुक्रवारी (दि.२५ जुलै) खेळाडू शहरातून रवाना झाले आहेत.

या पाचही दिव्यांग खेळाडूंना डॉ. विठ्ठलराव विखे पाटील स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स येथे प्रशिक्षण व स्पोर्ट्स थेरेपी सराव तज्ञ प्रशिक्षकांकडून करून घेण्यात आहे आहेत. या स्पर्धे साठी मतिमंद मुलांचे बालगृह पाथर्डी येथील खेळाडू बाबू, जलतरण स्पर्धेसाठी दिपक पावरा, कृष्णा व रज्जाक गोच्चू आणि पॉवर लिफ्टिंग स्पर्धे साठी अभिजित माने यांचा समावेश आहे. अभिजित माने हा दिव्यांग गटातील उत्कृष्ट जलतरणपटू असून, यावर्षी त्याने पॉवर लिफ्टिंग स्पर्धे त सहभाग नोंदवला आहे. प्रशिक्षक म्हणून संदीप रहाणे काम पाहत आहे.

### दिग्गज मान्यवरांकडून विद्यार्थ्यांना शुभेच्छा

स्पर्धेसाठी दिव्यांग मुलांना स्पेशल ऑलिम्पिक भारत-महाराष्ट्रचे अध्यक्ष धनश्री विखे पाटील, माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील, डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाऊंडेशनचे संचालक डॉ. अभिजीत दिवटे यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

# ... त्या घोषणाची जागा राष्ट्रीय स्मारक व्हावे : निस्ताने



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : ३१ मे १९१६ रोजी संध्याकाळी कापडबाजार येथील इमारत कंपनीमध्ये लोकमान्य टिळकांनी स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे व तो मी मिळवणारच ही घोषणा दिली होती. त्या जागेचे राज्य शासनाने सुशोभीकरण करावे व हे राष्ट्रीय स्मारक व्हावे त्यामुळे हे ठिकाण सर्व जनतेला माहिती होईल. यासाठी लवकरच मुख्यमंत्र्यांची व पालकमंत्र्यांची भेट घेणार आहे, असे प्रतिपादन भारतीय जनता युवा मोर्चाचे प्रदेश कार्यकारणी सदस्य अमोल निस्ताने यांनी केले

भारतीय जनता पार्टी शहर जिल्हा मध्यमंडळ वतीने लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची जयंती निमित्त कापड बाजार, इमारत कंपनी येथे असलेल्या लोकमान्य टिळक पुतळा येथे हा कार्यक्रम संपन्न झाला.

# .... आता साई माऊलीमध्ये २४ तास न्यूरो सर्जन उपलब्ध

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : अहिल्यानगर शहरातील पाईपलाईन रोडवरील साई माऊली सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचे मध्ये अहिल्यानगर जिल्ह्यातील नागरिकांसाठी एम्स हॉस्पिटलमधील न्यूरो सर्जन डॉ. अब्बास मोऐयादी हे रुग्णांच्या सेवेसाठी पूर्णवेळ २४ तास उपलब्ध रहाणार असल्याने साई माऊली हॉस्पिटलचे संचालक डॉ. संतोष गीते या दोन्ही डॉक्टरांचा सत्कार सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.



या कार्यक्रमाचा प्रारंभ दीप प्रज्वलनाने करण्यात आला. यावेळी मंचावर उपस्थित असलेल्या मान्यवरांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

साई माऊली सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये रुग्णांसाठी अद्ययावत सुविधा उपलब्ध असून यामध्ये आयसीयू, जनरल वॉर्ड, स्पेशल वॉर्ड, स्पेशल रूम व अत्याधुनिक ऑपरेशन थिएटर यांचा समावेश आहे. हॉस्पिटलमध्ये सर्व प्रकारचे कॅशलेस सुविधा उपलब्ध असून, शासकीय योजना देखील या हॉस्पिटलमध्ये उपलब्ध आहेत तसेच रुग्णांवर सवलतीच्या दरात उपचार केले जाणार आहेत. यावेळी न्यूरो सर्जन डॉ. अब्बास मोऐयादी, डॉ. तुकाराम, डॉ. गणेश गीते, डॉ. वर्षा कराड, डॉ. जयश्री तोंडे, डॉ. मंगेश राऊत, डॉ. मनोज घुगे, डॉ. किरण तुपे, लक्ष्मण महाराज कराड, हॉस्पिटल प्रशासक अधिकारी युनूस टेंगे आदी उपस्थित होते.

> अहिल्यानगरमधील रुग्णांना न्यूरो संबंधित उपचारांसाठी पुणे किंवा मुंबईसारख्या शहरांमध्ये जाण्याची गरज भासणार नाही. कारण न्यूरो सर्जन २४ तास साई माऊली हॉस्पिटलमध्ये रुग्णांच्या सेवेसाठी उपलब्ध असणार असून गरजू रुग्णांनी हॉस्पिटलला भेट द्यावी.
>
> – **डॉ. संतोष गीते**, हॉस्पिटल संचालक

# मीरा महांडुळे यांचे अल्पशा आजाराने निधन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : रयत शिक्षण संस्थेतील सेवानिवृत्त आदर्श शिक्षीका मीरा उमाकांत म हांडुळे (वय ८२) यांचे २४ जुलै अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांनी सावळीविहीर, वाळकी, भिंगार, अहिल्यानगर या ठिकाणी शिक्षिका म्हणून काम केले. त्यांचे पती याच संस्थेत एक आदर्श शिक्षक म्हणून सेवानिवृत्त आहेत. त्यांच्या पश्चात पती, मुलगा, स्नुषा व स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. शारदा महांडुळे, नात व नातू असा परिवार आहे.

# नगरमध्ये सासरकडून विवाहितेचा छळ

## अग्निशमन अधिकाऱ्यासह कुटुंबातील सदस्यांवर गुन्हा दाखल



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : विवाहितेचा शारीरिक मानसिक आणि आर्थिक छळ केल्याप्रकरणी अग्निशमन विभागातील अधिकारी भरत शंकर मिसाळ यांच्यासह त्यांच्या कुटुंबियाविरोधात शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पीडित महिने दाखल केलेल्या तक्रारीनुसार पती आणि सासऱ्याचे मंडळीकडून सातत्याने मारहाण शिवीगाळ पैशाची मागणी आणि जीविताला धोका असल्याचे म्हटले आहे.

फिर्यादी आणि भरत मिसाळ यांचा प्रेमविवाह २०१८ साली झाला होता. मात्र विवाहानंतर लगेचच मानसिक छळाला सुरुवात झाली. सासरच्या मंडळींनी तब्बल ५ लाख ५० हजार रुपयाची मागणी करत वारंवार माहेरकडून पैसे आणण्याचा तगादा लावला असे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

याप्रकरणी भरत शंकर मिसाळ (पती), शंकर उत्तम मिसाळ (सासरे), कमल शंकर मिसाळ (सासू) आणि धनश्री शंकर मिसाळ (ननंद) सर्व राहणार म्युन्सिपल कॉलनी, नालेगाव अहिल्यानगर यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास शिरूर पोलीस करत आहे.

# विद्यार्थ्यांना शिक्षणाची गोडी लागण्यासाठीच वह्यांचे वाटप

## बाबुशेठ टायरवाले; टायरवाले यांच्याकडून गरजू विद्यार्थ्यांना शालेय वह्याचे वाटप

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगामध्ये शिक्षणाला खूप महत्त्व प्राप्त झाले असून स्पर्धेच्या युगामध्ये प्रत्येक विद्यार्थी शिकला पाहिजे, यासाठी मातोश्री प्रतिष्ठानने पुढाकार घेत गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणाची गोडी लागावी यासाठी गरजूवंत विद्यार्थ्यांना ५ हजार वह्यांचे वाटप करण्यात येणार असल्याचे प्रतिपादन बाबुशेठ टायरवाले यांनी केले.



मातोश्री प्रतिष्ठानचे संस्थापक बाबुशेठ टायरवाले यांच्या वतीने महात्मा फुले वसतिगृह, लांडे थळ व सर्जेपुरा वस्तीमध्ये गरजू विद्यार्थ्यांना शालेय वह्याचे वाटप करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

यावेळी बाबुशेठ टायरवाले, बाळासाहेब बोराटे, अशोक दहिफळे, महेश लोंढे, पोपट पाथरे, आनंद शेळके, पुष्पा येळवंडे, सुरेश क्षीरसागर, पांडुरंग घोरपडे आदीसह विद्यार्थी, पालक, शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बाळासाहेब बोराटे म्हणाले की, गरीब कुटुंबातील विद्यार्थी शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे काम आपल्या सर्वांचे आहे. बाबुशेठ टायरवाले यांचे नगर शहराशी एक अतूट नाते असून ते नेहमीच गरजूवंतांना मदत करत असतात. त्यांनी कधीही राजकारण केले नाही. बाबुशेठ टायरवाले यांनी बेटी पढाव या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करत एक मदतीचा हात दिला आहे. यावेळी पोपट पाथरे यांनी प्रास्ताविक केले. तर आभार पुष्पा येळवंडे यांनी मानले.

> विद्यार्थी आपल्या आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षणापासून वंचित राहत असतात. आपण समाजाचे काहीतरी देणे लागते, या भावनेतून सामाजिक बांधिलकी जोपासत आपले कर्तव्य पार पाडले जात आहे. हिंदूहृदयसम्राट कै. बाळासाहेब ठाकरे यांच्या शिकवणीप्रमाणे ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण आम्ही करत असतो, समाजातील दिनदुबळ्यांचे प्रश्न मार्गी लावणे हेच आमचे उद्दिष्ट आहे.
>
> – **बाबुशेठ टायरवाले**

# ब्राम्हण समाजासाठी सर्वोतोपरी सहकार्य

## आ. काळे; बाजीराव पेशवे यांच्या आश्वारुढ पुतळ्याचे अनावरण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोळपेवाडी :** काळे परिवाराचा समाजकारणाचा वारसा पुढे चालविताना ब्राम्हण समाजाच्या अडी- अडचणी सोडवून ब्राह्मण सभागृहासाठी जास्तीत जास्त निधी देण्याचा प्रयत्न केला आहे. दिलेल्या निधीतून काही विकासकामे पूर्ण होत असून काही कामे भविष्यात होणार आहे. यापुढील काळातही निधीची आवश्यकता भासल्यास निधीची कमतरता पडू देणार नाही. कोणतीही गरज लागली तरी ब्राम्हण समाजासाठी माझे सदैव सर्वोतोपरी सहकार्य राहील, अशी



ग्वाही आ.आशुतोष काळे यांनी दिली.

कोपरगाव शहरात ब्राह्मण सभा कोपरगाव यांच्या वतीने श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे यांच्या अश्वारुढ पुतळ्याचा अनावरण सोहळा व गुणवंत विद्यार्थी गुणगौरव सोहळा माजी खा. विनय सहस्त्रबुद्धे यांच्या हस्ते व आ. आशुतोष काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला याप्रसंगी ते बोलत होते.

### पुणे नंतर कोपरगावात पेशवेंचा पुतळा

आ. काळे म्हणाले की, श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे यांनी कमी वयात गाजविलेल्या शौर्याचा मराठा बांधवांना अभिमान असून त्यांचे कार्य कधीही विसरू शकत नाही. त्यांच्या कार्याची आठवण कायम स्मरणात राहावी, यासाठी पुण्यात श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे यांचा पुतळा उभारण्यात आला असून त्यानंतर आपल्या कोपरगाव शहरात देखील श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे पुतळा उभारण्यात आला याचा आनंद वाटतो.

यावेळी माजी आ. स्नेहलता कोल्हे, पुण्याच्या थोरले बाजीराव पेशवे प्रतिष्ठाणचे सचिव कुंदनकुमार साठे, विश्वस्त श्रीकांत नगरकर, चिंतामणी क्षीरसागर, पेशवे घराण्याचे वंशज चंद्रशेखर बर्वे, अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्थेचे कोषाध्यक्ष प्रविण कुलकर्णी, कोपरगाव नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष संजय सातभाई, कोपरगाव ब्राह्मण सभेचे अध्यक्ष मकरंद को-हाळकर, उपाध्यक्ष बाळकृष्ण कुलकर्णी, सचिव सचिन महाजन आदी उपस्थित होते.

# लग्नाचे आमिषाने महिलेवर अत्त्याचार

## दोन मेव्हण्यांविरुद्ध पोलिसांत गुन्हा दाखल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** लग्नाचे आमिष दाखवत तीन वर्षांहून अधिक काळ एका महिलेसोबत शारीरिक संबंध ठेवून तिला फसवणाऱ्या तरुणाविरुद्ध पाथर्डी पोलीस ठाण्यात गंभीर स्वरूपाची तक्रार दाखल झाली आहे. या प्रकरणात मुख्य आरोपीसह त्याचे दोन मेव्हण्यांविरुद्धही विविध कालमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फसवणूक झालेल्या महिलेने पोलिसांना दिलेल्या तक्रारीनुसार, २०२० मध्ये सोशल मीडियाच्या माध्यमातून तिची आरोपी अलीम अब्बास शेख (रा. शेवगाव, जि. अहिल्यानगर) याच्याशी ओळख झाली. काही दिवसांतच मैत्री वाढली आणि आरोपीने प्रेम असल्याचे सांगून लग्नाचे आमिष दिले. नोव्हेंबर २०२१ मध्ये लोणावळ्यातील एका कॉटेजमध्ये आरोपीने पहिल्यांदा पीडितेसोबत शारीरिक संबंध ठेवले. त्यावेळी लग्न करणार आहे, असे सांगून तिला विश्वासात घेण्यात आले.

याप्रसंगानंतर पीडित महिला तिच्या वैवाहिक आयुष्यातील अडचणींमध्ये सापडली. तिचा संसार मोडला. अशावेळी आरोपीने तिला पुन्हा लग्नाचे आश्वासन देत विविध ठिकाणी बोलावून शारीरिक संबंध ठेवले. अखेर ११ जून २०२५ रोजी त्याने स्पष्ट शब्दांत सांगितले की, 'मी तुझ्याशी लग्न करू शकत नाही, माझे आधीच लग्न झाले आहे. आरोपीच्या या वागणुकीमुळे पीडित महिला अत्यंत अस्वस्थ झाली आणि अखेर पोलीस ठाण्यात धाव घेतली.

### या आरोपींवर गुन्हा दाखल

या प्रकरणात अलीम अब्बास शेख याच्यासह त्याचे दोन मेव्हणे सिकंदर मजनू शेख (रा. तिसगाव) आणि राजु गुलाब शेख (रा. शेवगाव) यांच्याविरुद्ध बलात्कार,फसवणूक, धमकी आणि मानसिक छळाच्या कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# काळे प्रकरणाचा सखोल तपास व्हावा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे शहरप्रमुख किरण गुलाबराव काळे यांच्याविरोधात दाखल करण्यात आलेल्या गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्याचा सखोल आणि नि:पक्षपाती तपास व्हावा, अशी मागणी खासदार नीलेश लंके यांनी अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे यांच्याकडे सविस्तर निवेदनाद्वारे केली आहे.

खासदार लंके यांनी महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांसह अप्पर पोलिस अधीक्षकांची शनिवारी भेट



घेऊन काळे यांच्यावर खोटा गुन्हा दाखल करण्यात आल्याचे ठामपणे सांगितले. दरम्यान निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, किरण काळे हे गेल्या अनेक वर्षांपासून राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात सक्रिय असून, नुकतेच त्यांनी अहिल्यानगर महानगरपालिकेतील तब्बल ३५० ते ४०० कोटी रुपयांच्या कथित भ्रष्टाचाराचा पर्दाफाश प्रसारमाध्यमांसमोर केला होता. त्यामुळेच पोलिस यंत्रणेवर राजकीय दबाव आणून गुन्हा दाखल केल्याचे संकेत मिळत आहेत.

# 'संजीवनी'च्या ८२७ विद्यार्थ्यांना नोकऱ्या

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव :** शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये संजीवनी इंजिनिअरींग कॉलेज ॲण्ड एमबीएच्या ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट विभागाने वेगवेगळ्या नामांकित कंपन्यांशी संपर्क साधून कंपन्याना अभिप्रेत असणारे तंत्रज्ञान विविध विभागांच्या मदतीने विद्यार्थ्यांमध्ये बिंबविले. याचाच परीपाक म्हणून तब्बल ८२७ विद्यार्थ्यांना वार्षिक पॅकेज रू. २७ लाखांपर्यंतच्या नोकऱ्या मिळाल्या. यामुळे विद्यार्थी व पालक वर्गात




आनंदाचे वातावरण संचारले आहे, अशी माहिती संजीवनी इंजिनिअरींग कॉलेज ॲण्ड एमबीएच्या अधिकृत सुत्रांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे.

चालु वर्षी दोन विद्यार्थ्यांना प्रत्येकी रूपये २७ लाख, चार विद्यार्थ्यांना प्रत्येकी २१ लाख, जपानच्या कंपनीने १०० विद्यार्थ्यांना प्रत्येकी १७ लाख, तीन विद्यार्थ्यांना प्रत्येकी ११.८३ लाख, पाच विद्यार्थ्यांना प्रत्येकी ११ लाख, दहा विद्यार्थ्यांना प्रत्येकी ९ लाख असे वार्षिक पॅकेज मिळाले. सरासरी प्रत्येकी रू. ५ लाखांचे वार्षिक पॅकेज मिळाले.

माजी मंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांनी ४२ वर्षांपूर्वी संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजची स्थापना केली. दर्जा व गुणवत्तेमध्ये कधीही तडजोड करायची नाही, अशी त्यांची शिकवण असायची. तिच परंपरा संजीवनीचे अध्यक्ष नितिनदादा कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढे राबविण्यात आली. स्व. कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजने शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून ऑटोनॉमस दर्जा प्राप्त केला. या सर्व बाबींचा परिणाम म्हणून ८२७ विद्यार्थ्यांना नामांकित कंपन्यांमध्ये नोकऱ्या मिळाल्या, तर काही विध्यार्थ्यानी उद्योजक होण्याचा निर्धार केला आहे, ही बाब स्व. शंकरराव कोल्हे यांना आदरांजली ठरणारी आहे.

**- अमित कोल्हे,**
**मॅनेजिंग ट्रस्टी, संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स**

# शौर्याची कथा म्हणजेच कारगिल विजय

## आ. काशिनाथ दाते; कारगिल विजय दिवस उत्साहात साजरा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर :** शौर्य, बलिदान व देशभक्ती ची अमर कथा म्हणजेच कारगिल विजय दिवस असाऱ्याचे गौरवोद्गार आ. काशिनाथ दाते यांनी काढले आहेत.

कारगिलच्या लढाईत शहीद झालेल्या वीरांच्या शौर्याची आठवण जागविण्याच्या उद्देशाने काल नवनागापूर येथे वीर सैनिक बहुउद्देशीय संस्था, अहिल्यानगर यांच्या वतीने कारगिल विजय दिवस मोठ्या उत्साहात साजरा




करण्यात आला. देशाबद्दल त्यागाची आणि सैनिकांप्रती कृतज्ञतेची भावना जागृत करणाऱ्या या कार्यक्रम प्रसंगी आ. दाते पुढे म्हणाले की, कारगिल युद्धात शहीद झालेल्या भारतीय सैन्याच्या, शूर अधिकाऱ्यांच्या स्मृतिप्रित्यर्थ 'कारगिल विजय दिवस' देशभरात साजरा करण्यात येतो. याच दिवशी भारतीय सैन्याच्या जवानांनी कारगिलमध्ये विपरित परिस्थितीत शत्रूसैन्याला नामोहरम केले. भारतीय सैन्याचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून आपण देशहितासाठी कार्य करणे, आवश्यक असल्याचे आ. दाते यांनी सांगितले.

आमदार दाते यांनी शहीद जवानांच्या स्मारकासाठी ५ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्याचा शब्द देत कारगिल युद्धात शहीद झालेल्या वीर जवानांच्या पावन स्मृतीस विनम्र अभिवादन केले. यावेळी औदयोगिक वसाहतीचे सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिक चौधरी, जिल्हा बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य वसंत चेडे, उद्योजक दिलीप दाते, बंडू नाना सप्रे, विजयराव शेवाळे आदी उपस्थित होते.

# शनिशिंगणापूर येथे भाविकांची गर्दी



**जनता आवाज वृत्तसेवा**

**सोनई :** श्रावण महिन्याच्या पहिल्या शनिवारी शनिशिंगणापूर येथे श्रद्धेचा महासागर उसळला होता. पावसाच्या रिमझिम सरी झेलत देशभरातून आलेल्या लाखो भाविकांनी शनिदेवाच्या चरणी नतमस्तक होत दर्शनाचा लाभ घेतला. पहाटेपासूनच मंदिर परिसर भक्तांच्या जयघोषांनी दुमदुमून गेला होता.

श्रावण महिन्याच्या निमित्ताने शनिदेवस्थान ट्रस्टने भाविकांसाठी विशेष सेवा सुरू केली असून, दर शनिवारी पहाटे ५ ते ७ या वेळेत ओल्या वस्त्रांनी चौथऱ्यावर जाऊन जल अर्पण करण्याची मुभा देण्यात आली आहे. ही सेवा २५ जुलैपासून २३ ऑगस्ट पर्यंत फक्त श्रावण महिन्यासाठीच उपलब्ध राहणार आहे. दररोज स्थानिक व पंचक्रोशीतील श्रद्धाळू पायी येऊन जल अर्पण करत असल्याचे चित्र दिसून आले. यंदा ट्रस्ट आणि प्रशासनाच्या संयुक्त नियोजनामुळे दर्शन व्यवस्था अत्यंत शिस्तबद्धपणे पार पडली.

### लटकूंकडून भाविकांना त्रास

सोनईमध्ये भक्तिपूर्ण वातावरणाला एका प्रकाराने गालबोट लागले. मंदिर परिसरातील पोलीस स्टेशनजवळ 'लटकू' भाविकांना विनाकारण अडवत असल्याच्या तक्रारी समोर आल्या. त्यांच्याकडे पैशांची जबरदस्तीने मागणी केल्याचे काही भाविकांनी सांगितले असून, यामुळे काही क्षण गोंधळाची स्थिती निर्माण झाली. संतप्त भाविकांनी प्रशासनाकडे तक्रार दाखल केल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी बंदोबस्त वाढवून परिस्थिती नियंत्रणात आणली.

# सर्व जागा अतिक्रमण मुक्त करा : ना. विखे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले :** भंडारदरा निळवंडे परीसरात पर्यटन विकासातून रोजगार निर्मिती करण्यासाठी जलसंपदा विभागाच्या जागा विकसित करण्याचा निर्णय विभागाने घेतला आहे. जिल्हाधिकारी आणि जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांनी तयार केलेल्या पर्यटन विकास आराखड्याची प्रभावी अमंलबजावणी होण्याच्या दृष्टीने विभागाच्या सर्व जागा अतिक्रमण मुक्त करण्याच्या सूचना जलसंपदा तथा पालक मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिल्या.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात राज्य सरकारने हरीत महाराष्ट्र समृध्द महाराष्ट्र या उपक्रमाच्या माध्यमातून १० कोटी वृक्ष लागवडीची चळवळ सुरू करण्यात आली असून जलसंपदा विभागाने यासाठी पुढाकार घेतला आहे. जिल्ह्यातील उपक्रमाचा शुभारंभ जलसंपदा मंत्री ना. विखे




यांचे उपस्थितीत भंडारदरा येथे करण्यात आला. याप्रसंगी आ.डॉ किरण लहामटे, आ. अमोल खताळ, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, जलसंपदा विभागाचे अधीक्षक प्रांताधिकारी अरुण उंडे, तहसिलदार सिध्दार्थ मोरे, अभियंता बाळासाहेब शेटे, नासिकचे राजेश गोवर्धने, कार्यकारी अभियंता स्वप्निल काळे, निळवंडे प्रकल्पाचे अभियंता प्रदिप हापसे, गणेश हारदे आदी उपस्थित होते. भंडारदरा धरणाचे शतकमहोत्सवी वर्ष विचारात घेवून या परिसराच्या विकासाचा निर्णय जलसंपदा विभागाने केला आहे. मंत्री विखे पाटील यांनी आज जलसंपदा विभागाच्या परिसरात असलेल्या जागांची पाहणी केली. जलसंपदा विभाग प्रथमच हा परिसर पर्यटनाच्या अनुषंगाने विकासित करणार आहे. यासाठी चांगला आराखडा तयार करण्यात आला असून त्याची प्रभावी अंमलबजावणी होण्याकरिता तातडीने कार्यवाही सुरू करण्याच्या सूचना मंत्र्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

गेली अनेक वर्षे झालेल्या दुर्लक्षामुळे जलसंपदा विभागाच्या जागावर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाले. जागा असतानाही त्याचा विनियोग करता आला नाही; परंतु आता विभागाने मराठवाडा आणि कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या कार्यक्षेत्रात शक्य असेल त्या ठिकाणी धरण परिसरात असलेल्या सर्व जागा विकसित करण्याचे धोरण घेतले.

# कोल्हार येथे भव्य प्रदर्शनास सुरुवात

## २१ स्टॉल; पुणे, नगर, राहाता, लोणी विक्रेत्यांचा सहभाग



**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोल्हार :** ऑनलाईन विक्रीच्या फसवेगिरी व्यवहाराला फाटा देत कोल्हार येथील बेलापूर रोड लगत असलेल्या वर्धमान जैन स्थानकामध्ये विविध गृह उपयोगी वस्तूंचे भव्य प्रदर्शन भरवण्यात आले आहे. शनिवार दिनांक २६ ते २७ एप्रिल असे दोन दिवस हे प्रदर्शन सकाळी ११ ते रात्री ९ वाजेपर्यंत सर्वांसाठी सुरू असणार आहे.

यामध्ये राखी, ज्वेलरी, लेडीज वेअर, किड्स वेअर, शर्ट्स, स्किन केअर याचबरोबर विविध घरगुती उपयोगी वस्तूंचे वेगवेगळे असे २१ स्टॉल मांडण्यात आले आहेत. पुणे, नगर, राहाता, लोणी, संगमनेर तसेच स्थानिक कोल्हारच्या विक्रेत्यांनी यामध्ये सहभाग घेतला आहे. अशी माहिती सोनाली चोरडिया यांनी दिली.

या प्रदर्शनाचे उद्घाटन व्यापारी पतसंस्थेचे अध्यक्ष संजय शिंगवी व उद्योजक महेंद्र कुंकूलोळ यांच्या हस्ते फित कापून करण्यात आले. याप्रसंगी उद्योजक नंदकुमार भटेवरा, सुधीर चोरडिया अशोक भाटिया, योगेश गांधी, मुकेश चोरडिया डॉ. राजेंद्र गुगळे आदी प्रमुख मान्यवर उपस्थित होते.

### प्रदर्शनामुळे बाजारपेठेला चालना: शिंगवी

संजय शिंगवी म्हणाले की, मोठ्या शहरांमध्ये ग्राहकांसाठी अशा प्रकारचे प्रदर्शन सर्रास भरवले जातात; परंतु कोल्हारसारख्या ग्रामिण भागात अशा प्रकारचे प्रदर्शन भरवून ग्राहकांना उत्तम पर्याय उपलब्ध करून दिल्याबद्दल मनस्वी आनंद होत आहे. यामुळे स्थानिक बाजारपेठेलादेखील चालना मिळते. तसेच ग्राहक वर्ग देखील उत्तम वस्तू खरेदीसाठी उत्सुक असतात. ऑनलाईन खरेदीच्या नादात ग्राहकांची फसवणूक होऊन अतोनात नुकसान होत असल्याचे वेळोवेळी निदर्शनास आले आहे. त्यामुळे अशा प्रकारचे प्रदर्शन या पुढील काळात देखील वेळोवेळी भरविण्यात यावे, असा सल्ला त्यांनी दिला.

# कारगिल युद्ध सैनिकांच्या बलिदानाचे प्रतीक : गोरक्ष गाडीलकर

## शिर्डी येथील साईबाबा संस्थान शैक्षणिक संकुलामध्ये कारगिल विजय दिन उपक्रमांनी साजरा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शिर्डी :** कारगिल युद्ध हे भारतीय सैनिकांच्या शौर्य, त्याग व बलिदानाचे प्रतीक आहे. तरुणांमध्ये राष्ट्रप्रेम व अभिमान निर्माण व्हावा, यासाठी दरवर्षी कारगिल विजय दिन साजरा केला जातो, असे प्रतिपादन श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी केले.

भारत सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या केंद्रीय संचार ब्युरो अहिल्यानगर यांच्यावतीने तसेच श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, माजी सैनिक आर. बी. घोडके स्मृती प्रतिष्ठान (महाराष्ट्र प्रांत) व सूर्यतेज संस्था कोपरगाव यांच्या विशेष सहभागातून शिर्डी येथील साईबाबा संस्थान शैक्षणिक संकुलामध्ये कारगिल विजय दिनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी गाडीलकर प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

या प्रसंगी माहिती व प्रसारण मंत्रालयाचे क्षेत्रीय प्रचार अधिकारी पी.



फणिकुमार, प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी सुरेश पाटील, साईबाबा संस्थानाचे प्रशासकीय अधिकारी विश्वनाथ बजाज, सूर्यतेज संस्थापक व स्वच्छतादूत सुशांत घोडके, मेजर प्रमोद धापटकर, प्राचार्य डॉ. संतोष औताडे उपस्थित होते.

गाडीलकर म्हणाले की, आजच्या तरुण पिढीने केवळ नोकरी किंवा व्यवसायाचे स्वप्न न पाहता देशसेवेचे भान ठेवणे गरजेचे आहे. एनसीसी अभ्यासक्रम विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, नेतृत्वगुण, सामाजिक बांधिलकी व राष्ट्रनिष्ठा निर्माण करतो. हे प्रशिक्षण केवळ शारीरिक क्षमतेपुरते मर्यादित नसून जबाबदार नागरिक घडविण्याचे कार्य करते.


### शहीद जवानांना आदरांजली

कार्यक्रमात भारतीय सैन्याच्या शौर्यगाथेचे दर्शन घडविणाऱ्या चित्रप्रदर्शनाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. ऑपरेशन सिंदूर व कारगिल विजय रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. देशभक्तिपर गीतगायनाचा कार्यक्रम व कारगिल युद्धातील सहभागी जवानांचा सत्कारही याप्रसंगी झाला. कारगिल युद्धातील शहीद जवानांना आदरांजली अर्पण करण्यात आली.

# ज्ञानेश्वर भोसले यांची प्रचार प्रमुखपदी वर्णी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर :** दरोडी येथील ज्येष्ठ माहिती अधिकार कार्यकर्ते ज्ञानेश्वर बबन भोसले यांची नवी मुंबई च्या माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाच्या वतीने पारनेर तालुका सहप्रचार प्रमुख नियुक्ती करण्यात आली आहे.



ज्ञानेश्वर भोसले यांना त्यांच्या नियुक्तीचे पत्र माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे संस्थापक अध्यक्ष सुभाष बसवेकर यांनी दिले आहे. या महासंघाचा प्रमुख उद्देश म्हणजे सर्व सामान्य जनतेमध्ये माहिती अधिकार अधिनियम -२००५ चा प्रचार व प्रसार करून, जनतेला सेवा व माहिती देणे, जनतेने या कायद्याने आपला अधिकार वापराबाबत माहिती देणे हा आहे.

भोसले यांनी लोकहिताची अनेक माहिती संबधित कार्यालयातून मिळवून अनियमित कामांचा पर्दाफाश केलेला आहे. त्यांच्या कार्याची दखल घेवून त्यांची नियुक्ती केली आहे.

## संपादकीय

# शेती आणि शेतकऱ्यांच्या मदतीसाठी

वीज, पाणी आणि भाव या तिहेरी संकटात अडकलेल्या शेतकऱ्यांचे आज संरक्षण करण्याची आवश्यकता आहे. एका व्यक्तीकडून जमिनीची साठवणूक रोखण्यासाठी आणि जमीन संसाधनांचे अधिक समन्यायी वाटप सुनिश्चित करण्यासाठी विविध राज्यांनी जमीन मर्यादा कायदे लागू केले. अतिरिक्त जमीन भूमिहीन आणि सीमांत शेतकऱ्यांना पुनर्वितरण करायची होती. भूसंपादन कायदा सुरुवातीला १८९४ मध्ये ब्रिटिशांनी लागू केला होता. १८९४ च्या कायद्यानुसार कार्यक्षम अपीलीय यंत्रणेला वाव नव्हता. अधिग्रहणाचा उद्देश सुनावणीद्वारे (कलम ५अ अंतर्गत) निश्चित केला गेला होता; परंतु सुनावणी घेणाऱ्या अधिकाऱ्यांनी त्यांचे विचार मांडण्याची आवश्यकता नाही. अधिग्रहणामुळे विस्थापित झालेल्या लोकांच्या पुनर्वसन आणि पुनर्वसनाशी संबंधित १८९४ च्या कायद्यात कोणत्याही तरतुदी नव्हत्या. १८९४ च्या भूसंपादन कायद्याचा प्राथमिक उद्देश जमीन संपादन होता आणि तो एका मोहिमेच्या स्वरूपात करायचा होता. तथापि, २०१३ च्या कायद्याचे शीर्षक जमीन संपादन, पुनर्वसन आणि पुनर्वसनात उचित भरपाई आणि पारदर्शकता कायदा, २०१३ असे आहे. या कायद्याअंतर्गत येणाऱ्यांना योग्य भरपाई आणि बाधित लोकांच्या पुनर्वसनाची तरतूद करतो, त्यांच्या कल्याणासाठी आणि भूसंपादन प्रक्रियेत पूर्ण पारदर्शकतेसाठी पुरेसे संरक्षण प्रदान करतो. जगातील सर्व अन्न आणि कृषी उत्पादनाचा आधार असलेल्या पीक अनुवांशिक विविधतेच्या देखभालीसाठी शेतकऱ्यांचे हक्क ही एक पूर्वअट आहे. मुळात, शेतकऱ्यांचे हक्क साकार करणे म्हणजे शेतकऱ्यांना शेतीच्या सुरुवातीपासून पीक अनुवांशिक संसाधने जपण्यास आणि विकसित करण्यास सक्षम करणे आणि जागतिक अनुवांशिक संसाधनांमध्ये या अपरिहार्य योगदानाबद्दल त्यांना ओळखणे आणि बक्षीस देणे. जगभरातील शेतकऱ्यांनी पीक अनुवांशिक संसाधनांचे संवर्धन आणि विकास करण्यात दिलेल्या प्रचंड योगदानाची दखल घेतो आणि या अधिकारांचे संरक्षण आणि प्रोत्साहन देण्यासाठी उपाययोजनांची तरतूद करतो. यामध्ये पारंपारिक ज्ञानाचे संरक्षण; वनस्पती अनुवांशिक संसाधनांशी संबंधित मुद्द्यांवर निर्णय घेण्यामध्ये शेतकऱ्यांचा सहभागी होण्याचा अधिकार; आणि वनस्पती अनुवांशिक संसाधनांच्या वापरातून उद्भवणारे फायदे वाटून घेण्यात समानतेने सहभागी होण्याचा अधिकार यांचा समावेश आहे.

शेतकऱ्यांना वनस्पती अनुवांशिक संसाधनांचे संरक्षक म्हणून कायम राहण्यास सक्षम करण्यासाठी शेतकऱ्यांच्या हक्कांचा एक अविभाज्य भाग म्हणजे शेतीत जतन केलेले बियाणे/प्रजनन साहित्य जतन करणे, वापरणे, देवाणघेवाण करणे आणि विक्री करणे. हे अधिकार बियाणे सुरक्षेसाठीदेखील महत्त्वाचे आहेत कारण स्वतःच्या किंवा शेजाऱ्यांकडून शेती केलेले जतन केलेले बियाणे हे विकसनशील देशांमधील बहुसंख्य शेतकऱ्यांसाठी बियाण्यांचा मुख्य स्रोत आहे. त्याबाबतच्या कायद्यात स्पष्टता नाही. २०१८ च्या अखेरीस न्यू यॉर्कमधील संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने ग्रामीण भागात काम करणाऱ्या शेतकरी कुटुंबांच्या आणि इतर लोकांच्या हक्कांच्या संरक्षणाबाबत एक अभूतपूर्व घोषणापत्र स्वीकारले . घोषणेच्या कलम १९ मध्ये विशेषतः बियाण्यांच्या अधिकाराचा समावेश आहे. त्यात त्यांच्या शेतीत जतन केलेले बियाणे किंवा प्रसार साहित्य जतन करण्याचा, वापरण्याचा, देवाणघेवाण करण्याचा आणि विकण्याचा अधिकार समाविष्ट आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवण्यासाठी देशात शेतकरी संरक्षण कायदा आणण्यासाठी व शेतमालाला चांगला भाव मिळण्यासाठी देशभरात वंदे किसान गुड्स रेल्वे सुरू करण्याच्या मागणीसाठी शेतकरी संघटना, पीपल्स हेल्पलाईन व भारतीय जनसंसदेच्या वतीने नुकतेच आंदोलन करण्यात आले. केवळ आंदोलन करून शेतकरी थांबले नाहीत. पुणतांब्यातील शेतकरी आंदोलनाने राज्याला दिशा दिली. आता शेतकरी संरक्षण कायद्यासाठी अहिल्यानगर आणि छत्रपती संभाजीनगरला झालेल्या दोन परिषदा महत्त्वाच्या आहेत. शेतकऱ्यांना आर्थिक स्वातंत्र्य आणि आर्थिक न्याय मिळवून देण्यासाठी शेतकरी संरक्षण कायद्याची गरज आहे. ७५ वर्षाच्या स्वातंत्र्यानंतर सुद्धा भारतातील सामान्य शेतकऱ्यांना आर्थिक न्याय मिळू शकलेला नाही. आज शेतकऱ्यांना फक्त पैशाची, कर्जमाफीची लालुच दाखवली जाते; परंतु प्रत्यक्षात शेतीमालाला उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळत नाही. अनेक वेळेला नाशवंत मालाचे भाव उत्पादन खर्चाच्या खाली जाते. रस्त्यावर माल फेकून द्यावा लागतो. यासाठी देशातील सर्व बाजारपेठा शेतकऱ्यांना उपलब्ध झाल्या पाहिजेत. त्यासाठी वंदे किसान गुडस्? ट्रेन्स्? शिवाय पर्याय नसून; मात्र केंद्र सरकार याबाबतीत कोणताही निर्णय घेत नसल्याचे संघटनांच्या वतीने स्पष्ट करण्यात आले. शेतकरी संरक्षण कायद्यातून पीकविमा योजना, शेतीमाल वाहून नेण्यासाठी कायमची वाहतूक यंत्रणा, विशेषतः मालवाहू रेल्वे, त्याशिवाय जिरायत शेतकऱ्यांसाठी सरकारी अनुदानातून जलतारा योजना राबविण्याची तरतूद, कृषी उद्योजक निर्माण होण्यासाठी कृषी उद्योग वसाहती प्रत्येक तालुक्यामध्ये झाल्या पाहिजेत.

शेतकऱ्यांसाठी शेतकरी न्यायालये या कायद्याने देशभरात स्थापन व्हावीत, ज्यातून शेतरस्ते, जमिनी खालून पाईपलाइन, शेती संदर्भातील वाद, शेती वाटप आणि इतर सर्व बाबी फक्त सहा महिन्यांच्या आत निकालात काढण्याची तरतूद असावी. आज सर्वत्र शेतीमाल भेसळ करून विकला जातो. त्यातून मोठ्या प्रमाणात कॅन्सरसारखे आजार पसरत आहेत. त्यामुळे एकंदरीत शेतीव्यवसायाला चांगले दिवस आणण्यासाठी आणि शेतकऱ्यांना आर्थिक न्याय मिळवून देण्यासाठी या कायद्याशिवाय पर्याय नसल्याची भूमिका आंदोलकांनी व्यक्त केली. नाशवंत शेतीमाल वाचविण्यासाठी शीतगृहांची प्रत्येक गावात सोय झाली पाहिजे. प्रत्येक गावासाठी कृषी पंचायतीची स्थापना या कायद्याने झाली पाहिजे, शेतकऱ्यांना सोलर उर्जेवर चालणारे ट्रॅक्टर्स, सोलर पंप, मोठ्या अनुदानातून मिळाले पाहिजे. शेतकऱ्यांना दुग्धव्यवसाय, पोल्ट्री व्यवसाय,आणि इतर व्यवसायांसाठी कमी व्याजदरात कर्ज मिळण्याची मागणी आंदोलकांनी केली; परंतु बहुजन ६३ टक्के शेतकरी या संरक्षण कायद्यापासून वंचित राहिले आहेत. दुर्दैवाने देशातील शेती व्यवसाय वाचवा असा टाहो फोडण्याची वेळ आली आहे. त्यासाठी घटनेमध्ये दुरुस्ती करून शेतकऱ्यांना विशेष मूलभूत हक्क दिले गेले पाहिजेत. आणि त्यासाठीची वैचारिक तात्त्विक मार्गदर्शन तत्त्वे ठरविणे काळाची गरज आहे.

# व्हिज्युअल डबिंगमध्ये एआयची चमक

**तंत्रवेध**

**– डॉ. दीपक शिकारपूर**




प्रेक्षकांना उपशीर्षके वाचण्याऐवजी डब केलेला चित्रपट पाहणे अधिक सोयीचे वाटते. लहान मुले किंवा नीट वाचू न शकणाऱ्यांसाठी डबिंग जास्त उपयुक्त ठरते. एकाच चित्रपटाच्या आवृत्त्या वेगवेगळ्या भाषांमध्ये तयार केल्याने तो प्रादेशिक बाजारपेठेत यशस्वी होऊ शकतो. वेगवेगळ्या भाषांमध्ये चित्रपट पुन्हा शूट करण्यापेक्षा डबिंग करणे अधिक सोपे आणि कमी खर्चाचे ठरते. एआय तंत्रज्ञान या क्षेत्रात घडवत असलेल्या करामतीचा मागोवा.

ऑटोमेशन' आणि 'कृत्रिम बुद्धिमत्ता ही आज सगळ्यात वेगाने वाढणारी क्षेत्रे बनत चालली आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता, मशिन लर्निंग, बिग डेटा ॲनालिसिस, रोबोटिक्स या आणि यासारख्या घटकांमुळे संबंधित संगणकीय प्रणाली आणि यंत्रणा अधिकाधिक ऑटोनॉमस म्हणजे स्वतंत्रपणे निर्णय घेणाऱ्या आणि स्वयंभू बनत आहेत यात शंका नाही. इंडस्ट्री ४.०, कृत्रिम बुद्धिमत्ता, ऑटोमेशन, रोबोटिक्स आणि डेटा अनॅलिटीक्स हे उद्याच्या तंत्रजीवनपद्धतीचे अविभाज्य घटक असतील. व्यक्तिगत तर सोडाच, परंतु औद्योगिक, सामाजिक आणि सार्वजनिक पातळीवर संगणकाच्या या विविध अवतारांचे अत्यंत क्रांतिकारी आणि दूरगामी परिणाम होतील. अनेक पारंपरिक संकल्पना मोडीत निघून नव्या पद्धती चटकन रुळतील. आज संगणकीय सूक्ष्म तंत्राचा प्रवेश प्रत्येक पैलूमध्ये झालेला आढळेल, किंबहुना तो तसा असणे हेच आपण गृहीत धरू इतक्या सहज हा बदल होणार आहे. याला 'इंटेलिजंट कॉम्प्युटिंग' असे म्हटले जाते. या क्षेत्रातील सतत बदलणारे तंत्रज्ञान आपल्या जगण्याच्या कल्पनाच बदलेल. बदलांचा हा वेग येत्या पाच–दहा वर्षांमध्ये अधिक वाढणार आहे. तो अधिक सर्वव्यापी होईलच, पण ज्या पैलूंमध्ये बदल दिसण्याची आपण कल्पनाही केली नव्हती अशा ठिकाणी तो आढळेल

आगीचा वापर किंवा चाकाच्या शोधापेक्षा कृत्रिम बुद्धिमत्ता हा एक महत्त्वाचा शोध टप्पा ठरू शकतो. हे जगात आतापर्यंतचे सर्वात वेगाने विकसित होणारे तंत्रज्ञान आहे. यामध्ये भाषा मॉडेल्स आणि सॉफ्टवेअर एजंट्सद्वारे अनेक व्हाईट–कॉलर नोकऱ्या पूर्णपणे संपवण्याची क्षमता आहे तसेच बुद्धिमान ह्युमनॉइड रोबोट्सच्या वाढत्या पिढीद्वारे अनेक ब्लू–कॉलर नोकऱ्याही संपू शकतात. हा असा पहिला शोध आहे, जो जवळजवळ प्रत्येक प्रकारे मानवापेक्षा श्रेष्ठ असण्याची धमकी देतो. कदाचित आपण विचार केला त्यापेक्षा लवकर. स्टिफन हॉकिंग्ज यांनी हा इशारा अनेक वर्षांपूर्वी दिला होता. आत्तापर्यंत शास्त्रीय आणि तांत्रिक बाबींमध्ये या तंत्राचा वापर झाला होता. मात्र कलाक्षेत्र यापासून दूर कसे राहील? चित्रपट एका भाषेत बनवला जातो. तो जगभरातील वेगवेगळ्या भाषा बोलणाऱ्या प्रेक्षकांपर्यंत पोहोचवायचा असतो, तेव्हा डबिंगचा उपयोग केला जातो. यामुळे प्रेक्षकांना चित्रपट त्यांच्या स्वतःच्या भाषेत समजण्यास मदत होते आणि ते कथेला अधिक चांगल्या प्रकारे जोडले जातात. डबिंगमुळे चित्रपटाचा प्रेक्षकवर्ग अनेक पटींनी वाढतो. प्रेक्षकांना उपशीर्षके (सबटायटलस) वाचण्याऐवजी डब केलेला चित्रपट पाहणे अधिक सोयीचे आणि आराम दायक वाटते. विशेषत:, लहान मुले किंवा वाचायला त्रास होणाऱ्यांसाठी डबिंग अधिक उपयुक्त ठरते. एकाच चित्रपटाच्या आवृत्त्या वेगवेगळ्या भाषांमध्ये तयार केल्याने तो प्रादेशिक बाजारपेठेत यशस्वी होऊ शकतो. वेगवेगळ्या भाषांमध्ये चित्रपट पुन्हा शूट करण्यापेक्षा डबिंग करणे अधिक सोपे आणि कमी खर्चाचे ठरते. यामुळे निर्मात्यांना कमी गुंतवणुकीत जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचता येते. आपण हे दाक्षिणात्य चित्रपटांबद्दल पाहिले आहे . आता अनेक चित्रपट एकाच दिवशी अनेक भाषेत प्रदर्शित केले जातात .

डबिंग ही एक गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. यामध्ये अनेक टप्पे असतात. सर्वात आधी मूळ चित्रपटातील संवाद दुसऱ्या भाषेत अचूकपणे भाषांतरित केले जातात. हे काम व्यावसायिक भाषांतरकार करतात, जे दोन्ही भाषा आणि चित्रपटाच्या सांस्कृतिक संदर्भांचे जाणकार असतात. भाषांतर केलेले संवाद पडद्यावर बोलणाऱ्या कलाकारांच्या ओठांच्या हालचालींशी जुळतील अशा प्रकारे तयार केले जातात. यासाठी शब्दांची निवड आणि वाक्यांची रचना काळजीपूर्वक करावी लागते. प्रत्येक पात्रासाठी योग्य आवाज असलेल्या कलाकारांची निवड केली जाते. हे कलाकार मूळ कलाकारांच्या आवाजाशी मिळताजुळता किंवा त्या पात्राच्या व्यक्तिमत्त्वाला साजेसा आवाज देतात. यासाठी ऑडिशन्स घेतल्या जातात. निवडलेले आवाज देणारे कलाकार स्टुडिओमध्ये जातात आणि पडद्यावर चित्रपट पाहताना भाषांतरित संवाद मायक्रोफोनवर रेकॉर्ड करतात. त्यांना मूळ कलाकारांच्या अभिनयाची आणि वेळेची जुळवाजुळव करावी लागते. रेकॉर्ड केलेले आवाज मूळ चित्रपटातील आवाजाच्या जागी व्यवस्थित जोडले जातात. आवाजाची गुणवत्ता, पार्श्वसंगीत आणि इतर ध्वनी प्रभावांची काळजी घेतली जाते, जेणेकरून डब केलेला भाग नैसर्गिक वाटेल. प्रक्रियेच्या अंतिम टप्प्यात, डब केलेले संवाद, संगीत आणि ध्वनी प्रभाव एकत्र मिसळले जातात. यामुळे संपूर्ण चित्रपट एकसंध आणि प्रभावी वाटतो. डबिंग करताना मूळ चित्रपटातील भावना, पोत आणि अभिनयाचा अंदाज कायम राखणे महत्त्वाचे असते. चांगल्या डबिंगमुळे प्रेक्षकांना चित्रपट इतर प्रदेशातील आहे असे वाटत नाही आणि ते कथेमध्ये पूर्णपणे सामील होऊ शकतात.

आज स्डबिंगमध्ये एआयचा वापर मोठ्या प्रमाणात वाढत आहे आणि या प्रक्रियेत अनेक महत्त्वपूर्ण बदल घडवत आहे. एआय–आधारित सॉफ्टवेअर मूळ संवादांचे जलद आणि अचूक भाषांतर करू शकते. एआय आता मानवासारखे नैसर्गिक आवाज तयार करू शकते. हे आवाज मूळ कलाकारांच्या आवाजाच्या टोन, लय आणि भावनांशी जुळवण्याचा प्रयत्न करतात. 'टेक्स्ट–टू–स्पीच' तंत्रज्ञानाचा वापर करून भाषांतरित मजकूर स्वयंचलितपणे आवाजात रूपांतरित केला जातो. एआय अल्गोरिदम व्हिडिओतील पात्रांच्या ओठांच्या हालचालींचे विश्लेषण करून तयार केलेला आवाज त्यांच्याशी जुळवण्याचा प्रयत्न करतात. एआय तंत्रज्ञान मूळ कलाकाराच्या आवाजाची नक्कल करू शकते. यामुळे डब केलेल्या संवादातही मूळ कलाकाराचाच आवाज असल्याचा अनुभव येतो. मूळ कलाकार डबिंगसाठी उपलब्ध नसतात किंवा त्यांचे निधन झालेले असते, अशा वेळी हे तंत्रज्ञान उपयुक्त ठरते. काही प्रगत प्रणाली तर व्हिज्युअल माहितीचा वापर करून अधिक नैसर्गिक लिप–सिंक तयार करू शकतात. यामुळे डब केलेला भाग मूळ भागासारखाच दिसतो. इथे एक उदाहरण देता येते. 'वॉच द स्काय' हा स्वीडिश चित्रपट व्हिज्युअल डबिंग नावाच्या तंत्राचा वापर करून कलाकारांच्या ओठांच्या हालचालींमध्ये बदल करत असून एकही दृश्य पुन्हा शूट न करता आंतरराष्ट्रीय प्रेक्षकांसाठी डब केलेल्या इंग्रजी संवादांनुसार मॅप करत आहे.

लॉस एंजेलिस येथिल 'फ्लॉलेस' ही चित्रपटनिर्माती एआय फर्म आणि त्यांच्या ट्रूसिंक तंत्रज्ञानामुळे हे शक्य झाले आहे. ते अभिनेत्याच्या संपूर्ण कामगिरीचे विश्लेषण करते, त्यांच्या चेहऱ्याचे व्हॉल्यूमेट्रिक ३ प्रतिनिधित्व तयार करण्यासाठी डीप लर्निंगचा वापर करते आणि नंतर पोस्ट–प्रॉडक्शनमध्ये फुटेजमध्ये त्यांच्या तोंडाच्या हालचाली अनुकूल करते. डबिंगच्या क्षेत्रात एआय एक शक्तिशाली साधन म्हणून उदयाला आले आहे. यामुळे भाषांतर, आवाज संश्लेषण आणि लिप–सिंकसारख्या प्रक्रियांमध्ये सुधारणा झाली आहे. यामुळे चित्रपटनिर्मात्यांना जागतिक स्तरावर मोठ्या प्रेक्षकांपर्यंत पोहोचणे अधिक सोपे आणि प्रभावी झाले आहे. तथापि, भावनात्मक बारकावे आणि सांस्कृतिक संवेदनशीलता यांसारख्या काही क्षेत्रांमध्ये अजूनही मानवी हस्तक्षेपाची गरज भासते. त्यामुळे भविष्यात एआय आणि मानवी सहकार्याने डबिंगची प्रक्रिया अधिक परिपूर्ण होईल यात शंका नाही.

एआयमुळे व्हीएफएक्स आणि डबिंगमध्ये अनेक फायदे असले तरी काही आव्हाने देखील आहेत. एआयमुळे काही कामे स्वयंचलित होत असल्याने कलाकारांच्या आणि डबिंग कलाकारांच्या नोकऱ्यांवर परिणाम होण्याची भीती आहे. तथापि, अनेक तज्ञांचे मत आहे की एआय मानवी सर्जनशीलतेची जागा घेणार नाही, तर एक शक्तीशाली साधन म्हणून काम करेल. यामुळे कलाकार अधिक सर्जनशील कामांवर लक्ष केंद्रित करू शकतील.

या पार्श्वभूमीवर डीपफेक तंत्रज्ञानाचा वापर, सिंथेटिक आवाजांची संमती आणि सांस्कृतिक गैरसमज यासारख्या नैतिक मुद्द्यांचा विचार करणे महत्त्वाचे आहे. पूर्णपणे एआय–आधारित डबिंगमध्ये भाषिक आणि सांस्कृतिक बारकावे गमावले जाण्याची शक्यता असते. त्यामुळे या कामी मानवी देखरेख आवश्यक आहे. एकंदरीत, डबिंग उद्योगासाठी एआय गेम–चेंजर ठरले आहे. यामुळे निर्मिती प्रक्रिया अधिक कार्यक्षम, जलद आणि परवडणारी होत आहे. यामुळे मनोरंजन उद्योगात नवनवीन शक्यता निर्माण होत आहेत. भविष्यात, मानवी सर्जनशीलता आणि एआय तंत्रज्ञानाचे सहकार्य या क्षेत्रांना अधिक उंचीवर घेऊन जाईल.

पान १ वरून

## ठाकरेंचे आमदार–खासदार भाजपच्या संपर्कात

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपूर्वी ठाकरे गटातील अनेकजण भाजपात आल्याचे दिसतील, असे गिरीश महाजन यांनी म्हटले.

राज्यातील मंत्रिमंडळ फेरबदलाच्या चर्चेबाबत गिरीश महाजन यांना विचारले असता, त्यांनी बोलताना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांच्यावरही जोरदार शब्दांत टीका केली. संजय राऊत हे सगळे मंत्रिमंडळ हटवायला बसले आहेत. त्यांना वाटत यांचे मंत्रिमंडळ जावे आणि आमचे मंत्रिमंडळ यावे. संजय राऊत यांना कोण विचारते? असा सवाल करत, वायफळ बडबड करायची, खोटे बोलून रेटून न्यायचे हा संजय राऊत यांचा धंदा झाला असल्याची टीका गिरीश महाजन यांनी केली.

## ... तर तुला शंभर टक्के लाभ मिळेल

... तर शंभर टक्के तुझे काम होईल

अजित पवारांनी सल्ला दिल्यानंतरही तो युवक बोलतच राहिला. यावर अजित पवार यांनी नाराजी व्यक्त करत तुला हीच जागा आठवली का हे बोलण्यासाठी? असा सवाल संबंधित तरुणाला केला. त्यानंतरही त्या व्यक्तीने थांबण्याचे नाव न घेतल्याने ए, बोलायची ही पद्धत नाही! असे म्हणत अजित पवारांनी थांबवले. तसेच मी माहिती घेईल. मी कागद घेईन. तो व्यवस्थित पाहीन. तू बोलतोय त्यात तथ्य आहे का? हे बघेन. राज्य सरकारचं जे क्रीडाविषयक धोरण असेल त्यात तू बसत असशील तर शंभर टक्के तुझं काम होईल. तू सरकारच्या धोरणात बसत नसशील तर तुला तसे कळवण्यात येईल, असे थेट अजित पवार यांनी त्या व्यक्तीला समजावले.

अजित पवार म्हणाले की, या योजनेत पुरुष लोकांची नावे येण्याचे काहीच कारण नाही. जर या योजनेत पुरुषांची नावे आलेली असतील, तर ही योजना पुरुषांसाठी नव्हती, त्यामुळे ते पैसे आम्ही वसूल करू. त्यांनी जर सहकार्य केले नाही तर, लाडकी बहीण योजनेचा गैरफायदा घेऊन जर त्यांनी या योजनेचा लाभ घेतला असेल, तर त्यांच्यावर आम्ही कारवाई करण्यास मागे–पुढे पाहणार नाही, असा इशारा अजित पवारांनी दिला.

## खडसेंचे मंत्री गिरीश महाजनांना आव्हान

आरोप प्रत्यारोपाच्या फैरी सुरुवातीपासूनच सुरू आहेत. यात आता जळगाव जिल्ह्यातील स्थानिक आमदाराने देखील उडी घेतली आहे. त्यातच एकनाथ खडसे यांनी मंत्री गिरीश महाजन यांना तीन चॅलेंज स्वीकारण्याचे आव्हान दिले आहे.

भाजपचे मंत्री गिरीश महाजन यांच्यावर पलटवार करत एकनाथ खडसे म्हणाले की, त्यांनी माझे चॅनेल स्विकारावे. यामध्ये त्यांनी स्वतःच्या प्रॉपर्टीची चौकशी करावी, माझ्या मुलाच्या मृत्यूची सीआयडी चौकशी करावी आणि प्रफुल्ल लोढा याने महाजन यांच्यावर केलेल्या आरोपाच्या पार्श्वभूमीवर त्याची नार्को टेस्ट करावी. हे माझे महाजन यांना आव्हान असल्याचे खडसे यांनी म्हटले आहे.

एकनाथ खडसे आणि गिरीश महाजन यांच्या वादात मंगेश चव्हाण यांनी देखील उडी घेतली होती. एकनाथ खडसे यांचे अनेक महिलांशी संबंध होते, असा आरोप चव्हाण यांनी केला होता. त्यावर देखील खडसे यांनी पलटवार केला आहे. मंगेश चव्हाण यांनी माझ्या चारित्र्यावर आरोप केले आहेत. त्यामुळे चव्हाण यांनी पुरावा दाखवावा. त्यांनी एक जरी पुरावा दाखवला तर मी राजकारणातून निवृत्ती घेईल, असे थेट आव्हान देखील एकनाथ खडसे यांनी दिले आहे.

महाजन हे अर्ध्या खात्याचे मंत्री

गिरीश महाजन यांनी जिल्ह्यात कोणते मोठे विकासाचे काम केले? महाजन हे केवळ अर्ध्या खात्याचे मंत्री आहे. महाजन यांच्या हिंमत असेल तर त्यांनी केलेल्या मोठ्या विकास कामाचे एकतरी उदाहरण दाखवावे? जिल्ह्यात झालेली सर्व धरणे ही माझ्या कार्यकाळात पूर्ण झाली असल्याचा दावा एकनाथ खडसे यांनी केला.

## राहुरी खुर्दमध्ये गुटखा–मावा विक्रेत्यावर छापा

जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक योगेश चाहे, कर्मचारी दिगंबर कारखिले, सुनील पवार, अरविंद भिंगारदिवे, मल्लिकार्जुन बनकर, उमेश खेडकर, दिनेश मोरे, अजय साठे, अमोल कांबळे, दीपक जाधव यांच्या पथकाने केली.

## चक्क गुगल मॅपकडून दिशाभूल?

पोलिसांनी ही बाब वेळीच लक्षात घेतली. त्यांनी तातडीने बोटीच्या सहाय्याने घटनास्थळी धाव घेतली आणि पाण्यात अडकलेल्या महिलेची सुखरूप सुटका केली. क्रेन च्या मदतीने कारलाही बाहेर काढण्यात आलं. अपघातस्थळ सागरी पोलिस चौकीजवळ असल्यामुळे मदत लवकर पोहोचली आणि मोठा धोका टळला.

बचावलेल्या महिलेने पोलिसांना सांगितलं की, गुगल मॅपवर दाखवलेला रस्ता तिला सरळ वाटला. प्रत्यक्षात, तो रस्ता जेट्टीवर जाऊन थांबतो आणि तिथे कोणताही अडथळा किंवा सूचना फलक नव्हता. रात्रीचा काळ असल्याने रस्ता स्पष्ट दिसला नाही आणि अनपेक्षितपणे कार पाण्यात गेली.

पान १ वरून

## सहकार बळकट करा, सरकार तुम्हांला पाठबळ देईल

संघटनेचे अध्यक्ष गणेश रेवगडे, जिल्हा उपनिंबधक मंगेश सुरवसे यांच्यासह सहकारी संस्थाचे प्रतिनिधी आणि राज्यातून आलेले सचिव उपस्थित होते. पालकमंत्री विखे पाटील म्हणाले की, सेवा सहकारी सोसायटीसमोर असलेल्या प्रश्नाचा यापुर्वी गांभीर्याने कधीच विचार झाला नाही. परंतू देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर प्रधानमंत्र्यांनी स्थापन केलेल्या सहकार मंत्रालयामुळे देशातील सहकार चळवळीला भक्कम पाठबळ मिळत आहे. २०४७ पर्यत विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करण्यात सहकार चळवळीचे योगदान महत्वपूर्ण ठरणार असल्याने सेवा सहकारी सोसायटीच्या कार्यपद्धतीला पाठबळ देवून ग्रामीण अर्थव्यवस्थेला आधार आणि सहकारातून रोजगार निर्मिती करण्याचे धोरण केंद्र सरकारचे असल्याचे त्यांनी सांगितले.

सोसायटीच्या माध्यामातून केवळ गावपातळीवर राजकारण झाले. त्यामुळे अर्थिक विकासाचे केंद्र बनण्याऐवजी सोसायट्या राजकारणाचे अड्डे बनल्या, अशी खंत व्यक्त करून सोसायटी तोट्यात असली तरी संचालक होण्याची धडपड थांबत नाही. संचालकांच्या राजकारणात सचिवाचा बळी जातो. ही परिस्थिती बदलण्याची गरज आहे. याकरिता सचिवांचे भविष्य घडविण्यासाठी पेन्शन योजना लागू करता येईल का? याचाही विचार करण्याची सूचना त्यांनी केली.

सोसायट्यांचे मानांकन करून त्याच्या दर्जाप्रमाणे बॅकींग प्रणालीशी जोडून घेण्याचे प्रयत्न झाले. तर सोसायट्यांना व्यवसायाची साखळी निर्माण होईल. चळवळीच्या उज्ज्वल भवितव्याची सुरूवात झाली. त्यामुळे सहकार चळवळ बळकट करा, सरकार तुम्हाला पाठबळ देईल, असे विखे पाटील यांनी आश्वासित केले. आ. सत्यजित तांबे यांनी संगमनेर अकोले तालुक्यातील सहकार चळवळीची पार्श्वभूमी सांगून सहकार चळवळीमुळे शेतकरी जगला.

सचिवांच्या मागण्यासाठी केलेल्या पाठपुरव्याची माहिती दिली. आ. किरण लहामटे यांनी सरकार तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिल, असे सांगून राज्य सरकार चांगल्या पध्दतीने काम करीत असल्याने प्रश्नाची सोडवणूक निश्चीत होईल, असे सांगितले. संघटनेचे अध्यक्ष गणेश रेवगडे यांनी सचिवाचे प्रश्न प्रास्ताविकातून मांडले.

## भूमी अभिलेख नक्शा प्रकल्पांतर्गत भूमापन होणार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शिर्डी :** केंद्र शासनाच्या नक्शा प्रकल्पांतर्गत शिर्डी शहराचे नगर भूमापन करण्यात येणार आहे. नक्शा प्रकल्पासाठी राज्यातील १० शहरांची निवड करण्यात आलेली आहे. नक्शा प्रकल्पांतर्गत शिर्डी शहरातील जमिनीचा ड्रोनद्वारे सर्व्हे करण्यात येणार आहे. यामध्ये शिर्डी शहराचे ड्रोनद्वारे सर्व्हेक्षण पूर्ण करण्यात आलेले आहे. सदर सर्वेक्षणानंतर सव्ह ॅ ऑफ इंडियाकडून ड्रोन नकाशा प्राप्त झालेला आहे.

सदर ड्रोन नकाशाच्या आधारे भूमी अभिलेख विभाग व शिर्डी नगरपालिका येथील अधिकारी प्रत्येक मिळकतीमध्ये जाऊन त्याची सविस्तर चौकशी करणार आहेत. त्यानंतर प्रत्येक मिळकतीचा स्वतंत्र नकाशा व मिळकत पत्रिका तयार करण्यात येणार आहे. नक्शा प्रकल्पाचे वैशिष्ट्य म्हणजे यामध्ये प्रत्येक फ्लॅटचे देखील स्वतंत्र मिळकत पत्रिका तयार करण्यात येणार आहे. भूमी अभिलेख विभागाचे अधिकारी हे जेव्हा प्रत्यक्ष चौकशीसाठी मिळकतीवर येतील त्यावेळी सर्व मिळकत धारकांनी त्यांचे सातबारा खरेदीखत नगरपालिका उतारा इत्यादी पुराव्याचे कागदपत्र सादर करून अधिकाऱ्यांना सहकार्य करणे आवश्यक आहे. नक्शा प्रकल्पाबाबत जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांनी आढावा बैठक घेऊन भूमी अभिलेख व शिर्डी नगरपालिका येथील अधिकाऱ्यांना नक्शा प्रकल्पाची प्रभावी अंमलबजावणी करण्याची सूचना केली.

## 'रयत' च्या विद्यार्थ्यांनी अनुभवली प्रत्यक्ष मतदान प्रक्रिया

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोल्हार :** रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल व कनिष्ठ (कला) महाविद्यालय, कोल्हार बु. जि. अहिल्यानगर येथे नुकतीच वर्ग प्रतिनिधी निवडणूक प्रक्रिया पार पडली. निवडणूक प्रक्रिया काय असते मतदान केंद्र मतदान अधिकारी यांच्या समवेत मतदान कसे करावे याबद्दलचे धडे वर्गनिहाय विद्यार्थ्यांना देण्यात आले.

या निवडणूक प्रक्रियेतून प्रत्येक वर्गाचे वर्ग मंत्रिमंडळ तयार करण्यात आले. मुख्याध्यापकांच्या संकल्पनेतून शालेय वर्ग मंत्री मंडळाची निवडणूक घेण्याचे नियोजन केले गेले. ईव्हीएम मशीन तयार करून प्रत्यक्षात डिजिटल बोर्ड तयार करण्यात आले. इच्छुक उमेदवाराची घोषणा करण्यात आली. उमेदवारांना चिन्ह देण्यात आले व आपल्या चिन्हाचा प्रचार करण्यासाठी दोन दिवसाची वेळ देण्यात आली विद्यार्थ्यांना ईव्हीएम मशीन वर मतदान कसे करावे याची माहिती वर्गातून इंटरक्टिव्ह बोर्डवर देण्यात आली. तसेच आदल्या दिवशी प्रचार प्रसार थांबवून आचारसंहिता देखील पाळण्यात आली. मतदान अधिकारी आणि केंद्राध्यक्ष यांच्या उपस्थितीत मतदान गोपनीय पद्धतीने घेण्यात आले.

मतदान करताना ओळखपत्रा साठी प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्यासोबत आधार कार्डची झेरॉक्स सक्तीने आणण्यास सांगितले होते. मतदान प्रक्रियेतील पारदर्शकता आणि प्रत्यक्ष अनुभव घेऊन विद्यार्थी भारावून गेले.या निवडणूक कार्यक्रमाचे उदघाटन स्कूल कमिटी सदस्य संतोष थेटे पा., योगेश कोळपकर यांच्या शुभहस्ते झाले विद्यालयाचे मुख्याध्यापक अंकुशराज जामदार उपमुख्याध्यापक सिताराम बोरुडे पर्यवेक्षिका श्रीमती संजीवनी आंधळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही प्रक्रिया राबविण्यात आली मुख्य निवडणूक अधिकारी म्हणून शब्बीर शेख यांनी जबाबदारी पार पाडली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून मच्छिंद्र मोहोंडुळे, सुधीर फुलारी, दीपक मगर यांनी काम केले.शुभम पवार, तेजस शेलार, ऋषिकेश जाधव, महेश जगधने यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

# अशक्य वाटणारी कामे पूर्णत्वास नेली : डॉ. सुजय विखे पाटील

## बंदिस्त नलिका वितरण प्रणालीचे लोकार्पण



**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहाता** : डोऱ्हाळे, कोऱ्हाळे, वाळकी, गोरक्षवाडी, मोरेवाडी या गावांमध्ये पाणी येईल, असा विचारसुद्धा लोकांनी स्वप्नात केला नव्हता. मात्र सखोल अभ्यास करून लाभक्षेत्रातील शेवटच्या गावापर्यंत पाणी पोहोचविण्याचे कार्य नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून पूर्ण करता आले.

आपले विरोधक, विपरित विचार करणारे आणि काही हितचिंतक देखील म्हणत होते की, या गावांना पाणी मिळणार नाही. मात्र, हा कार्यकर्त्यांच्या आशावादाचा आणि संघर्षाचा विजय आहे. विरोधकांच्या सातत्यपूर्ण टीकेच्या पार्श्वभूमीवर हे यश म्हणजे आपला खरा विजय आहे. अशक्य वाटणारे काम आपण शक्य करून दाखवले, असे डॉ. सुजय विखे पाटील यांनी नमूद केले.

डॉ. सुजय विखे पुढे म्हणाले, काही लोकांनी केवळ बोगद्यात फोटो काढले, हेल्मेट घालून हात वर करून केवळ नाटकं केली. मात्र शेवटी खऱ्या अर्थाने पाणी नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या प्रयत्नांमुळेच मिळाले असल्याचे सांगितले. विखे यांच्या या वक्तव्यामुळे उपस्थितांमध्ये एकच हशा पिकला.

राहाता तालुक्यातील मोरवाडी बंदिस्त नलिका वितरण प्रणाली व संगमनेर तालुक्यातील गोरक्षवाडी बंदिस्त नलिका वितरण प्रणालीचे लोकार्पण पद्मश्री विठ्ठलराव विखे सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन डॉ. सुजय विखे पाटील यांच्या हस्ते संपन्न झाले. या कार्यक्रमास कैलास तांबे, मारुती पाटील, डॉ. सोमनाथ गोरे, प्रकाश गोरे, संतोष गोर्डे, मच्छिंद्र पाटील उपस्थित होते डॉ. सुजय विखे म्हणाले, निळवंडे लाभक्षेत्रातील कोणताही शेतकरी पाण्यापासून वंचित राहणार नाही. विधानसभा निवडणुकीत दिलेले वचन आम्ही केवळ एका वर्षात पूर्णत्वाच्या दिशेने नेले आहे. पाण्याचा शब्द दिला होता, त्यातील ८० टक्के काम पूर्ण झाले आहे. उर्वरित काम देखील लवकरच पूर्ण करून पाणी प्रत्येक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविणार असल्याचे सांगितले.

# मुळा धरण ७५ टक्के भरले



**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी** : दक्षिण अहिल्यानगर जिल्ह्याची जीवनदायनी म्हणून ओळखले जाणाऱ्या मुळा धरणात काल सायंकाळी १९५०७दलघफू म्हणजे ७५ टक्के पाणीसाठा झाल्याने लाभक्षेत्रात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. गेल्या पंधरा दिवसांपासून धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पावसाने दडी मारल्याने धरणात कोतूळकडून येणारी पाण्याची आवक मंदावली होती. मात्र, गुरूवार दि. २४ रोजी रात्रीपासून मुळा धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील अकोले तालुक्यातील हरिश्चंद्रगड, आंबीत, पाचनाई, कोथळा, कोहने, कोतूळ परिसरात पावसाचे आगमन झाल्याने काल सकाळी धरणात ३ हजार २१२ क्युसेसची आवक होती. मात्र, या पावसामुळे काल सायंकाळी ती ८ हजार ३७३ क्युसेस झाली. व पाणीसाठा १९ हजार ५०७ दलघफू झाला आहे.

धरणात यावर्षी आतापर्यंत १० हजार ६०२ दलघफू नवीन पाण्याची आवक झाली आहे. मुळा धरणाचा पाणीसाठा जवळपास ७५ टक्क्यावर पोहचला आहे.

## नगीना पिंपळगाव ते लाडगाव रस्ता उद्ध्वस्त



**जनता आवाज वृत्तसेवा**

**वैजापूर** : नगीना पिंपळगाव ते लाडगाव रस्ता उद्ध्वस्त झाला आहे. या मार्गावरून दररोज प्रवास करणाऱ्या नागरिकांची मोठी तारांबळ होत आहे.

विशेषतः वयोवृद्धांना या खडखडीत रस्त्यावरून दवाखान्यात जायचे झाले तर ती एक मोठी झुंज ठरते. चालणेही शक्य होत नाही आणि दुर्दैव म्हणजे रस्त्याची अवस्था एवढी वाईट आहे की कोणतीही वाहनसेवा उपलब्ध होत नाही.दवाखान्यात जायचं म्हटलं तर गाडी येत नाही. रस्ता एवढा वाईट आहे की दुचाकीही जात नाही. रस्त्यावर ठिकठिकाणी पडलेले खोल खड्डे, चिखल व पाण्याची साचलेली स्थिती, यामुळे अपघात होण्याची शक्यता अधिक आहे. रुग्णवाहिका किंवा इतर आपत्कालीन सेवा देखील वेळेत पोहचू शकत नाही.ग्रामपंचायतीकडून किंवा स्थानिक नेतेमंडळींकडून कोणतीही ठोस पावले उचलली जात नाहीत हे दुर्दैवी आहे. ज्येष्ठ नागरिक, महिलावर्ग, लहान मुलं यांच्यासाठी हा रस्ता आरोग्याचा धोका बनला आहे.

# ताहाराबाद येथे बाप-लेकास मारहाण

## आठ जणांविरोधात राहुरी पोलिसांत गुन्हा दाखल



**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी** : लहान मुलांना मोबाईल खेळू देवू नका, असे म्हणाल्याने राग आल्याने नऊ ते दहा जणांनी दोघा बाप लेकांना फायटर, दगड आणि लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. सदर घटना राहुरी तालुक्यातील ताहाराबाद येथे २२ जुलै रोजी रात्रीच्या सुमारास घडली.

गोकुळ धोडिंबा मोरे (वय ५५) हे राहुरी तालुक्यातील सात्रळ येथे राहत आहेत. २२ जुलै रोजी सायंकाळी गोकुळ मोरे हे कुटुंबासह ताहाराबाद येथील यात्रोत्सवात गेले होते. रात्री ११ वाजेच्या सुमारास गोकुळ मोरे यांचा मुलगा राहुल हा ताहाराबाद येथील त्यांच्या पाहुण्याकडे गेला. त्यावेळी तेथे काही मुले मोबाईल खेळत होती. ते पाहून राहुलने त्याच्या हातातील मोबाईल घेऊन मोबाईल खेळू नका, असे सांगितले. तेव्हा त्यांनी राहुलला शिवीगाळ केली. त्यावेळी गोकुळ मोरे व त्यांचा दुसरा मुलगा नवनाथ तेथे गेले. त्या ठिकाणी गोकुळ मोरे व राहुल आरोपींना समजावून सांगत असताना आरोपींनी त्यांना शिवीगाळ करून फायटर, दगड आणि लाथाबुक्क्यांनी मारहाण केली.

गोकुळ धोडिंबा मोरे यांच्या फिर्यादीवरून आरोपी नवनाथ बर्डे, भारत पैसे (दोघे रा. ताहाराबाद) व अज्ञात सात ते आठ इसम अशा नऊ ते दहा जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# रिमझिम पावसाने पिकांना जीवदान



**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव शहर** : कोपरगाव तालुक्यात खरीप हंगामातील पिके पाऊस नसल्यामुळे करपू लागली होती. जर या आठवड्याभरात पाऊस आला नसता तर सर्व पिके मातीमोल होण्याची भीती निर्माण झाली होती. अखेर कोपरगाव तालुक्यात मागील दोन दिवसांपासून रिमझिम पावसाच्या सरी बरसत असून या पावसामुळे खरीप पिकांना एक नवसंजीवनी मिळाली आहे.

या रिमझिम पावसाने जमिनीला काही अंशी तरी ओलावा मिळाल्याने शेतकरी बळीराजा सुखावला आहे. यावर्षी मान्सूनने सुरुवातीलाच पावसाने ओढ दिल्याने शेतकरी बळीराजा चिंतेत सापडला होता तरी देखील पाठचाऱ्याचे पाणी तर विहिरीचे पाणी देऊन शेतकऱ्यांनी पेरणी केलेला पिकाला पाणी दिले. मात्र पावसाने बरेच दिवस सुट्टी घेतल्यामुळे लावलेले पिक सुकायला सुरुवात झाली होती. मात्र मागील दोन दिवसांपासून सुरू असलेल्या रिमझिम पावसाच्या सरीमुळे काही प्रमाणात का होईना पिकांना जीवदान मिळणार आहे.

पावसामुळे मका, सोयाबीन, बाजरी, कुळिद यासारख्या खरीप पिकांची वाढ पुन्हा जोमाने होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे काही अंशी तरी शेतकरी बळीराजा सुखावला आहे. मान्सूनपूर्व झालेल्या पावसानंतर शेतीतील खुरपणीच्या कामाला देखील वेग येईल.

## क्रेडिट एक्सेस इंडिया फाऊंडेशनकडून दहावीच्या विद्यार्थिनींना शिष्यवृत्ती वाटप

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : अहिल्यानगर जिल्ह्यातील क्रेडिट एक्सेस इंडिया फॉउंडेशनच्या माध्यमातून क्रेडिट एक्सेस ग्रामीण लिमिटेडच्या (ग्रामीणकुटा) वतीने आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि ग्रामीण भागातील इयत्ता दहावी (एसएससी) बोर्डाची परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थिनींना शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात आले.

जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयात पोलीस उप अधीक्षक जगदीश भांबल यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे वितरण करण्यात आले. या प्रसगी संस्थेचे विभाग प्रमुख ज्ञानेश्वर कदम, क्षेत्रीय अधिकारी रविंद्र रक्टाटे, शाखाधिकारी अमित कदम आदींसह पालक उपस्थित होते.




या उपक्रमांतर्गत गुणवत्ताधारक आणि गरजू विद्यार्थिनींना त्यांच्या पुढील शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य पुरविण्यात आले. या शिष्यवृत्तीचा आरती इथापे, स्नेहल सोनवणे, अनुष्का सातदिवे, श्यामल ठाणगे, समीक्षा दहातोंडे, साक्षी आव्हाड, अनुजा गर्जे, अक्षदा कदम या विद्यार्थिनीना लाभ मिळाला आहे.

पोलीस उप अधीक्षक जगदीश भांबल यांनी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांमधील विद्यार्थ्यांचा भवितव्याचा विचार करुन क्रेडिट एक्सेस ग्रामीण लिमिटेडच्या वतीने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे कौतुक केले. संस्थेचे विभागीय अधिकारी ज्ञानेश्वर कदम यांनी विद्यार्थिनींना पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या आणि शिक्षणाचे महत्त्व विशद केले.

मायक्रो फायनान्स कंपनी असलेल्या क्रेडिट एक्सेस ग्रामीण लिमिटेडने दिलेल्या शिष्यवृत्तीमुळे ग्रामीण भागातील मुलींना उच्च शिक्षणाची संधी मिळून त्यांना सक्षम आणि स्वावलंबी बनण्यास मदत होणार असल्याची भावना पालकांनी व्यक्त केली. क्रेडिट एक्सेस ग्रामीण लिमिटेडतर्फे दरवर्षी अशा उपक्रमांचे आयोजन केले जात असल्याची यावेळी माहिती देण्यात आली.

# योगासन स्पर्धेत वसुंधरा अकॅडेमीचे सुयश



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले** : अहमदनगर जिल्हा योगासन स्पोर्ट्स असोसिएशन आयोजित सहावी जिल्हास्तरीय योगासन स्पर्धा व राज्य निवड चाचणी संगमनेर मालपाणी लॉन्स येथे संपन्न झाली. या स्पर्धेमध्ये वसुंधरा अकॅडेमीचे विद्यार्थी सहभागी झाले होते. या स्पर्धेत संपूर्ण जिल्ह्यातून दोनशेहून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता.

यामध्ये वसुंधरा अकॅडेमीची ओवी शरद सातपुते हिला आर्टिस्टिक योगात सुवर्णपदक तर ट्रॅडिशनल बॅकबेंडिंगमध्ये रौप्यपदक, स्नेहल संजय शेटे हिला आर्टिस्टिक पियरमध्ये रौप्य आणि ट्रॅडिशनल ट्विस्टिंग प्रकारात कांस्यपदक, काव्या विजय शेणकर हिला आर्टिस्ट्रिक पेअर ट्रॅडिशनल बॅकबेंडिंगमध्ये रौप्यपदक, श्रेया धनराज वाकचौरे हिला फॉरवर्ड बेडिंगमध्ये रौप्यपदक, विहान मेहुल शहा यास सुपाइन पोज योगा प्रकारात रौप्यपदक, ईश्वरी शरद सातपुते हिला ट्रॅडिशनल योगा प्रकारात पाचवा क्रमांक, कार्तिकी ज्ञानदेव आरोटे हिस सहभाग प्रमाणपत्र प्राप्त झाले.

योग शिक्षिका वर्षा गोडे यांनी सर्व विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. संस्थेचे संस्थापक मधुकर नवले, सचिव विक्रम नवले, कॅम्पस डायरेक्टर व वसुंधरा अकॅडेमीच्या प्राचार्या डॉ. जयश्री देशमुख, उपप्राचार्या राधिका नवले, मारुतीराव कोते अभिनव पब्लिक स्कूलच्या प्राचार्या अल्फोन्सा डी., सर्व विभागांचे प्राचार्य व शिक्षक यांच्या अनेक मान्यवरांनी अभिनंदन केले.

## नितेश गायकवाडांना जीवे मारण्याची धमकी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : देवीभोयरे येथील अवैध दारू विक्री बंद करणारे आणि दारूबंदी उपोषणकर्ते समाजसेवक ॲड. नितेश जयवंत गायकवाड यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आली. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

समाजसेवक ॲड. नितेश गायकवाड यांना गावातील दारू बंद करण्यामध्ये प्रयत्न केला. त्या काही प्रमाणात यश देखील आले, पण अवैध दारू विक्री करणारे व्यक्ती राजरोषपणे दारू विक्री करत असून पारनेर पोलीस प्रशासनाला देवीभोयरे येथील सहापैकी चार दारू धंदे बंद करण्यात यश आले आहे. परंतु गावातील दोन अवैध दारू विक्री करणारे व्यक्ती अवैध दारू धंदे बंद करत नसल्याने पारनेर पोलीस प्रशासन वारंवार छापेमारी करत आहे. त्यामुळे अवैध दारू विक्रेत्यांनी मनामध्ये रागाची आणि सूड घेण्याची भावना निर्माण झाली आणि त्यामुळे गावातील दारूबंदी करणारे आणि दारूबंदी उपोषणकर्ते ॲड. नितेश जयवंत गायकवाड यांच्या राहत्या घरी येऊन सायंकाळी त्यांच्या घरी येऊन त्यांना कुटुंबीयांना जीवे मारण्याची धमकी देऊन शिवीगाळ केली.

# किरण काळे नाशिक कारागृहात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : विवाहितेवर अत्याचार केल्याप्रकरणी अटकेत असलेले उद्धव बाळासाहेब ठाकरे सेनेचे अहिल्यानगर शहरप्रमुख किरण काळे यांना शुक्रवारी न्यायालयात हजर केले असता त्यांना न्यायालयीन कोठडी देण्यात आली आहे. येथील सबजेल कारागृहात जागा नसल्यामुळे त्यांना नाशिकला पाठविण्यात आले आहे, अशी माहिती कोतवाली पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक प्रताप दराडे यांनी दिली.

विवाहितेवर अत्याचार केल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. याप्रकरणी




कोतवाली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल असून, त्यांना मंगळवारी (दि. २२) पहाटे अटक करण्यात आली. ते पोलिस कोठडीत होते. पोलिस कोठडीची मुदत संपल्याने त्यांना शुक्रवारी येथील जिल्हा न्यायालयात हजर करण्यात आले. सहदिवाणी न्यायाधीश तथा प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी डी. के. पाटील यांनी न्यायालयीन कोठडी दिली. काळे यांच्या वतीने ज्येष्ठ विधिज्ञ अभिजित पुप्पाल यांनी जामीन मिळण्यासाठी अर्ज दाखल केला होता.

# सोमैया हायस्कूलमध्ये शिक्षक-पालक सहविचार सभेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : हिंद सेवा मंडळाच्या क. जे. सोमैया हायस्कूलमध्ये इ. ५ वी ते इ. १० वीच्या शिक्षक व पालकांची सहविचार सभा मोठ्या उत्साहात संपन्न झाली. या सभेच्या अध्यक्षस्थानी सी. डी. जैन कॉमर्स कॉलेजचे माजी प्राचार्य डॉ.गोरख बारहाते होते.

प्रमुख मान्यवर विद्यालयाचे चेअरमन रणजित श्रीगोड, ज्युनिअर विभागाचे जितेंद्र अग्रवाल, प्रशासकिय अधिकारी बी. एस. कांबळे, शंभुक विद्यार्थी वसतीगृहाचे अधिक्षक अशोक दिवे, मुख्याध्यापक भूषण गोपाळे होते. या सभेमध्ये पालक शिक्षक संघाची स्थापना करण्यात आली. अध्यक्षपदी भूषण गोपाळे, उपाध्यक्ष अशोक दिवे, सचिव अनिल चोभे, सहसचिव मंजुषा गायकवाड यांची निवड करण्यात आली. पर्यवेक्षक कल्याण लकडे यांनी विद्यालयातील विविध उपक्रम, भौतिक सुविधा, स्पर्धा परिक्षा या बाबत माहिती दिली.

अध्यक्षीय भाषणात डॉ. गोरख बारहाते यांनी मुलं आयुष्याची संपत्ती आहे. मुलांची योग्य वाढ करावी, मुलांना मोबाईल पासुन दुर ठेवावे, शैक्षणिक उपयोगासाठीच मोबाईल वापर असावा. पालक शिक्षक संवाद असावा. मुलांना मन मोकळे करण्याची संधी द्यावी. असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रमेश धोंडलकर यांनी केले. आभार रुपाली केवल यांनी मानले.

# नवीन पीक विम्याकडे शेतकऱ्यांची पाठ

## टक्केवारीच्या रकमेत शेतकऱ्यांकडून हप्ता घेण्यात येणार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : प्रति अर्ज भरुन सर्वसमावेशक पीक विमा योजना सरकारने राबविली. त्यात शेतकऱ्यांना या योजनेचा दिलासा मिळाला. पण हीच योजना बंद करून शेतकऱ्यांकडून पुन्हा पीक निहाय पोटहिस्सा घ्यायचा, असा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांनी याबद्दल आपला रोष व्यक्त करत या योजनेकडे पाठ फिरविली आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यात भारतीय कृषी विमा कंपनी लिमिटेड या कंपनीद्वारे प्रत्येक पिकासाठी वेगवेगळ्या टक्केवारीच्या रक्कमेत शेतकऱ्यांकडून हप्ता घेण्यात येणार आहे. सोयाबीन, तूर, बाजरी या प्रमुख खरीप पिकांमध्ये केंद्र व राज्य सरकारचा हप्त्यापोटी वेगवेगळ्या टक्केवारीच्या पटीमध्ये सहभाग असणार आहे.



सोयाबीनची विमा संरक्षित रक्कम प्रति हेक्टर ५८ हजार रुपये असून शेतकरी विम्याचा हप्ता दोन टक्के प्रमाणे ११६० रुपये, केंद्राचा दीड टक्के प्रमाणे ६७० रुपये आणि राज्याचा दीड टक्के प्रमाणे ६७० रुपये हप्त्यापोटी हिस्सा असणार आहे. बाजरी या पिकाची विमा संरक्षित रक्कम ३२००० रुपये प्रतिहेक्टर असून विमा कंपनी दहा टक्के हप्त्यापोटी रक्कम घेणार आहे. त्यापैकी दोन टक्के शेतकरी हिस्सा ६४० रुपये, केंद्र शासनाचा चार टक्के हिस्सा १२८० रुपये आणि राज्य शासनाचा चार टक्के प्रमाणे १२८० रुपये हिस्सा सहभाग असणार आहे.

### कापूर, कांदा पिकास सरकारची मदत नाही

प्रमुख पीक कपाशीची विमा संरक्षित रक्कम प्रतिहेक्टर ६० हजार रुपये असून यामध्ये तीन टक्के हफ्त्यापोटी शेतकऱ्याकडून १८०० रुपये प्रति हेक्टर घेण्यात येणार आहेत. तसेच कांदा या नगदी पिकाकरीता ६८ हजार रुपये प्रति हेक्टर विमा संरक्षित रक्कम असून त्यापैकी ०.७५ टक्के रक्कम शेतकरी हप्त्यापोटी रुपये ५१० देणार आहे. विशेष म्हणजे कापूस आणि कांदा या नगदी पिकांकरिता केंद्र व राज्य सरकारचा विमा हप्त्यापोटी सहभाग नाही.

# दाढ परिसरातील लम्पी साथ रोगाची मंत्री विखेंकडून गंभीर दखल

## पशुसंवर्धन विभागाकडून उपाययोजना सुरू



**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी :** दाढ बुद्रुक येथे जनावरांना झालेल्या लम्पी साथरोग आजारची गंभीर दखल घेत पशुसंवर्धन विभागाच्या अधिकाऱ्यांना तातडीने उपाय योजना करण्याच्या सूचना ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिल्या. ना. विखे पाटील सध्या गावोगावच्या आढावा बैठका घेवून लोकांच्या समस्या जाणून घेत आहेत. त्यांनी प्रत्यक्ष गावात जावून त्यांनी अधिकारी आणि शेतकऱ्यांशी संवाद साधला.

राहाता तालुक्यातील दाढ बुद्रुक येथे गेल्या काही दिवसांपासून लम्पी आजाराने थैमान घातले आहे याबाबत ग्रामस्थ आणि पशुपालकांनी लम्पी साथ रोगासंदर्भात गांभीर्य निदर्शनास आणून दिले.

पशुसंवर्धन आयुक्त प्रवीण देवरे यांनी या भागात दौरा करत दुध उत्पादकांना लम्पी आजाराबाबत मार्गदर्शन करून लसीकरण मोहीम हाती घेतली आहे. यामुळे पशुपालकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

दाढ बुद्रुक येथील दुध उत्पादक शेतकऱ्यांनी गावात लम्पी आजाराने धुमाकूळ घातला असून अनेक जनावरे दगावल्याची गंभीर बाब असल्याने पशुसंवर्धन विभागाने सर्व उपाययोजना तातडीने करण्याच्या सूचना मंत्र्यांनी दिल्या.

पशुसंवर्धन विभागाचे डॉ. दशरथ दिघे व त्यांच्या टिमने दाढ बुद्रुक गावात पोहोचून संबंधित लम्पी आजाराने ग्रस्त जनावरांना उपचार सुरू केले तसेच इतर जनावरे या आजाराने बाधीत होवू नयेत म्हणून लसीकरण व उपाययोजना सुरू केल्या आहेत. रात्री उशिरापर्यंत पशुसंवर्धन विभागाची टिम थेट गोठ्यात जावून मार्गदर्शन करत होती. या भागात पशुसंवर्धन आयुक्त डॉ. प्रविण देवरे, प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त नाशिक डॉ. बाबुराव नरवडे, जिल्हा पशुसंवर्धन उपाआयुक्त डॉ. संतोष पालवे, जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त डॉ. सुनील तुंबारे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. दशरथ दिघे, सहाय्यक आयुक्त जिल्हा पशुवैद्यकीय चिकित्सालय डॉ. मधुकर राजळे यांनी भेट देत लम्पी आजार, लसीकरण याबाबत अधिकाऱ्यांना सुचना केल्या.

यावेळी विखे पाटील कारखान्याचे संचालक सुनील तांबे, गोरक्षनाथ तांबे, प्रताप तांबे, भाजपाचे मंडल अध्यक्ष योगेश तांबे, सरपंच योगेश सातपुते, उपसरपंच अ‍ॅड. नकुल तांबे, संतोष वाणी, संजय गाडेकर, प्रमोद बनसोडे, सचिन वाणी, जितेंद्र माळवदे आदी उपस्थित होते.

पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यामध्ये लम्पी विषाणूची वाढती प्रकरणे लक्षात घेता, सतर्क राहण्याची गरज आहे. लम्पी त्वचेचा रोग हा गुरांमध्ये पसरणारा विषाणूजन्य रोग आहे. त्यामुळे, जनावरांमध्ये ताप, त्वचेवर गाठी, भूक न लागणे आणि दूध उत्पादन घटणे यांसारखी लक्षणे दिसू शकतात. या रोगाचा प्रसार टाळण्यासाठी, जनावरांची नियमित तपासणी करणे, बाधित जनावरांना वेगळे ठेवणे आणि शक्य असल्यास लसीकरण करणे आवश्यक आहे. लम्पी विषाणू वाढल्यास जनावरांमध्ये ताप, त्वचेवर गाठी, नाक आणि डोळ्यातून पाणी येणे, तसेच भूक न लागणे यांसारखी लक्षणे दिसल्यास त्वरित पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांशी संपर्क साधा. लम्पी त्वचेच्या रोगासाठी लसीकरण हा प्रभावी उपाय आहे. त्यामुळे, शक्य असल्यास जनावरांना लस टोचून घ्या. बाधित जनावरांना कळपातून वेगळे ठेवा. यामुळे, इतर जनावरांमध्ये या रोगाचा प्रसार होणार नाही. जनावरांच्या गोठ्याची आणि आजूबाजूच्या परिसराची नियमित स्वच्छता ठेवा. बाधित जनावरांशी संपर्क टाळा आणि शक्य असल्यास, इतर जनावरांना त्या ठिकाणी जाण्यापासून परावृत्त करा. असे आवाहन जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. दशरथ दिघे यांनी सांगितले.

---

# नगरपरिषदेने काम सुरु केल्याने आंदोलन स्थगित



**जनता आवाज वृत्तसेवा**

**शिरूर :** दशक्रिया विधी घाट येथे नाभिक समाजासाठी केस कर्तन विधी मुंडण करण्यासाठी रूमसह विविध सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या प्रलंबित मागणीची शिरूर नगरपरिषद प्रशासनाने दखल घेत प्रत्यक्ष कामास सुरुवात केल्याने शिरूर शहर नाभिक संघटनेचे प्रितेश फुलडाळे यांनी प्रतिकात्मक मुंडन आंदोलन स्थगित केले आहे.

यावेळी शिरूर नगरपरिषदेचे प्रशासकीय अधिकारी राहुल पिसाळ, शामली लाड, सागर बडगुजर, गौरव कुलथे, तेजस शिंदे, आदित्य बनकर, भुषण कडेकर, बाळासाहेब पुंडे, विजय आंधळे, महेश लोळगे, गोरक्ष शिंदे, संतोष शिंदे, अजय गायकवाड, संतोष इंगळे, बबन वाघमारे यांसह उपस्थित होते.

> अनेक दिवसांच्या प्रलंबित मागणीची शिरूरचे तहसीलदार बाळासाहेब म्हस्के, शिरूर नगरपालिकेचे मुख्याधिकारी प्रितम पाटील यांनी दखल घेऊन प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्यात आल्याने प्रतिकात्मक मुंडण आंदोलन स्थगित करण्यात आले आहे.
>
> **– प्रितेश फुलडाळे**

शिरुर शहरातील दशक्रिया विधी घाट येथे केस कर्तन विधी मुंडण करण्यासाठी केस कर्तनालयासाठी रुम, बैठक व्यवस्था, कट्टे, कायमस्वरुपी पाणी, लाईटसह विविध सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या अनेक दिवसांच्या प्रलंबित माग्ण्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी २८ जुलै रोजी शिरुर तहसिल कार्यालयासमोर सामाजिक कार्यकर्ते व प्रितेश फुलडाळे यांनी प्रतिकात्मक मुंडण आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा निवेदन देवून दिला होता.

---

# राहुरीत सफरचंदाचा ट्रक पलटी



**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी :** राहुरी शहरालगत नगर-मनमाड महामार्गावर काल पहाटेच्या सुमारास सफरचंदाने भरलेला मालवाहतूक करणारा ट्रक पलटी झाला.

शिर्डीहून दक्षिणेकडे सफरचंद घेऊन जाणारा मालट्रक राहुरी लगत गाडगे महाराज आश्रम शाळेसमोर काल पहाटेच्या सुमारास पलटी झाला. रस्त्यावरील स्पीड ब्रेकरचा अंदाज न आल्याने वाहनावरील नियंत्रण सुटून ट्रक पलटी झाल्याचा अंदाज आहे.

रात्रीच्या गस्तीवर असणाऱ्या पोलिसांनी तात्काळ ११२ क्रमांकाला संपर्क करत घटनास्थळी धाव घेतली. एकेरी वाहतूक वळविण्यात येऊन सकाळपर्यंत मालट्रकमधील सफरचंदाचे खोके काढून जेसीबीला पाचारण करण्यात आले होते. घटनास्थळी गर्दी झाली होती.

> **रस्त्यांवर सूचना फलक लावण्याची मागणी**
>
> राहुरी शहरातील बस स्थानक चौकात मल्हारवाडी रोड ते नवी पेठ या ठिकाणी मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांची व नागरिकांची वर्दळ असते. या ठिकाणीही झेब्रा क्रॉसिंग स्पीड ब्रेकर होणे अत्यावश्यक आहे. तसेच रस्त्यांवर सूचना फलक लावण्यात यावे, अशी मागणी प्रवाशांसह नागरिकांनी केली आहे.

यापूर्वीही याच ठिकाणी वाहने पलटी होण्याच्या घटना घडलेल्या आहेत. या ठिकाणी असणारा स्पीड ब्रेकर सूचना फलक नसल्याने व दिशादर्शक नसल्याने वाहन चालकांना स्पीड ब्रेकर व मोठे वळण असल्याने स्पीड ब्रेकर असल्याचा अंदाज येत नसल्याने अपघात घडतात.

---

# आनंदऋषीजींकडून सर्वधर्म भावाची शिकवण

## सीईओ आनंद भंडारी; चिचोंडीत आनंदऋषीजींचा जन्मोत्सव सोहळा



**जनता आवाज वृत्तसेवा**

**करंजी :** जैन धर्मियांचे आद्य गुरु व संत आचार्य आनंदऋषीजी यांनी सर्व जगाला व मानवतेला सर्व धर्म समभावाची शिकवण दिली, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी केले.

पाथर्डी तालुक्यातील चिचोंडी येथे आनंदऋषीजी यांचा जन्मोत्सव १२५ वा जन्म सोहळा संपन्न झाला. यावेळी ते बोलत होते.

चिचोंडी सरपंच एकनाथ आटकर शिक्षण संस्थेचे सचिव सतीश गुगळे, सुरेश कुचेरिया, चुनीलाल गुगळे, चंपालाल गांधी, प्राचार्य दिलावर फकीर आदी उपस्थित होते. यावेळी चिचोंडी, शिराळ, धारवाडी, पाथर्डी, करंजी, मिरी परिसरातून लाखो भाविकांसह राजू मुथ्या, धरम गुगळे, गटशिक्षणाधिकारी शिवाजी कराड, गटविकास अधिकारी संगीता पालवे, श्रीकांत आटकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्तविक सतीश गुगळे यांनी केले. तर आभार आनंद विद्यालयाचे प्राचार्य दिलावर फकीर यांनी मानले.

> आचार्य आनंदऋषीजी यांनी खऱ्या अर्थाने जैन धर्माला ऊर्जा देण्याचे काम केले. तसेच जैन धर्माची ओळख संपूर्ण देशालाच नव्हे तर जगाला करून दिली. त्यांनी तेराव्या वर्षीच दीक्षा घेतली. कुटुंब व संसार सोडून ते धर्मासाठी गावोगावी अनवाणी फिरत सर्वसामान्यांना मार्गदर्शन करत होते. आनंदऋषीजी हे जैन धर्माचेच गुरु नव्हते तर ते सर्व धर्मातील सर्वसामान्य जनतेला गुरुवाणी सांगत होते.
>
> **– आनंद भंडारी, सीईओ**

---

# घरफोडीसह अत्त्याचार करणारा गजाआड



**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड :** अल्पवयीन मुलीवर अत्याचार करणारा तसेच घरफोड्या करणाऱ्या व विविध पोलीस स्टेशनला गंभीर गुन्हे दाखल आसलेल्या सराईत गुन्हेगाराच्या मुसक्या आवळण्यात जामखेड पोलीसांना यश आले आहे. जामखेड शहरातील मिलिंदनगर भागातुन या आरोपीस पोलीसांनी ताब्यात घेतले आहे.

पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, फरार आरोपी ज्ञानेश्वर लिंग्या काळे (रा. जांब, ता. भुम, जिल्हा धाराशिव) या आरोपीविरोधात जामखेड पोलीस ठाण्यात अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्या प्रकरणी तसेच घरफोडी व इतर गुन्हे दाखल आहेत.

जामखेड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांना दि. २४ जुलै २०२५ रोजी गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, काळे हा जामखेड शहरातील मिलिंदनगर भागात आला आहे, अशी माहिती मिळाली.

यानुसार पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांनी त्यांचे पथक आरोपीस पकडण्यासाठी मिलिंदनगर भागात रवाना केले.

यावेळी या ठिकाणी आरोपी ज्ञानेश्वर लिंग्या काळे हा आरोपी मिलिंदनगर भागातील काटवनात लपलेला निदर्शनास आला. यावेळी त्याला ताब्यात घेण्यात आले.

या प्रकरणी पोलिसांनी आरोपीविरोधात जामखेड पोलीस स्टेशनला आर्म ॲक्टप्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

सदरची कारवाई पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, कर्जतचे उपविभागीय पोलीस अधिकारी गणेश उगले यांच्या मार्गदर्शनाखाली जामखेड पोलीसांच्या पथकाने केली आहे.

---

# महिपती महाराज यात्रेत भाविक महिलेचे दागिणे लांबविले

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी खुर्द :** राहुरी तालुक्यातील ताहाराबाद येथे चार दिवस संत महिपती महाराज यांचा यात्रा उत्सव सुरु होता. यात्रा उत्सवात गर्दीचा फायदा घेऊन अज्ञात भामट्या महिलेने सृष्टी म्हसे या विवाहित तरुणीच्या गळ्यातील एक तोळा वजनाचे सोन्याचे मनी मंगळसूत्र चोरुन नेले.

ही विवाहित तरुणी कोंढवड येथे रहावयास आहे. दुपारी ३ वाजेच्या सुमारास सृष्टी म्हसे ही तरुणी तीची जाव व भाया यांच्यासह ताहाराबाद येथे यात्रेनिमित्त गेले होते. सृष्टी म्हसे व तीची जाव यात्रेत फिरत असताना काही दुकानाजवळ खुप गर्दी होती. त्या ठिकाणी खुप महिलाही होत्या. त्यावेळी अज्ञात भामट्या महिलेने गर्दीचा फायदा घेऊन सृष्टी म्हसे या तरुणीच्या गळ्यातील एक तोळा वजनाचे मनी मंगळसूत्र चोरुन नेले.

मंगळसूत्र चोरी गेल्याचे लक्षात आल्यावर त्यांनी मंगळसुत्राचा परिसरात शोध घेतला, मात्र ते मिळुन आले नाही. त्यांच्या शेजारी असलेल्या महिलेने मंगळसुत्र चोरुन नेल्याचा त्यांना संशय आहे.

सृष्टी संभाजी म्हसे या तरुणीने राहुरी पोलीस ठाण्यात धाव घेऊन फिर्याद दाखल केली. त्यानूसार अज्ञात महिलेविरोधात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला. पुढिल तपास पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे.

---

# पाटणी विद्यालयात पर्यावरण जागृतीसह गरजूंना मदत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** नमो सायकल ऑटो एजन्सी आणि टी आय सायकल ऑफ इंडियातर्फे पाटणी विद्यालयात गो सायकल गो ग्रीन उपक्रमांतर्गत पर्यावरण जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. चित्रकला, निबंध, स्लो सायकल, सायकल सजवा आणि वक्तृत्व स्पर्धांद्वारे विद्यार्थ्यांमध्ये सायकलच्या महत्त्वाविषयी जागृती करण्यात आली.



समारोप समारंभात विद्यालयाचे चेअरमन भरत कुंकलोळ, फारूख शेख, सुरेश कुंकूलोळ, भैय्या अग्रवाल, उमेश अग्रवाल यांच्या उपस्थितीत विजेत्यांना बक्षिसे देण्यात आली. नमो सायकलतर्फे गरजू विद्यार्थी ऋषिकेश गायधने आणि श्रावणी बडदे यांना हर्क्युलस सायकल भेट देण्यात आली. यावेळी पालक भावूक, तर विद्यार्थी आनंदित झाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत मुख्याध्यापक चंद्रशेखर वाघ यांनी केले. सूत्रसंचालन अनुप्रिती पवार यांनी केले. तर संतोष एडके यांनी आभार मानले.

गणेश नागपुरे, राकेश शिंदे, उर्मिला पुजारी, बाबासाहेब औटी आणि शिक्षकवृंद यांच्या प्रयत्नांनी कार्यक्रम यशस्वी झाला.

---

# ग्रामीण भागातील विद्यार्थीच स्पर्धेत यशस्वी

## माजी शिक्षण मंत्री थोरात; प्राचार्य के. जी. खेमनर यांचा सेवापूर्ती सोहळा संपन्न

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** ग्रामीण भागामधील पालकांनीही इंग्रजी माध्यमांच्या शाळेमध्ये मुले टाकले आहेत. मात्र मराठी माध्यमांच्या शाळांमधून होत असलेल्या चांगल्या कामांमुळे अनेक विद्यार्थी पुन्हा जिल्हा परिषदेच्या शाळांकडे वळाली आहेत. मराठी शाळांमधील विद्यार्थ्यांना त्यांचे प्रॉब्लेम स्वतः त्यांना सोडवावी लागतात. यामुळे ते स्पर्धेमध्ये यशस्वी ठरत असून प्राचार्य के. जी खेमनर यांनी अत्यंत सेवाभावी आणि प्रामाणिकपणे केलेली शिक्षण क्षेत्रातील सेवा सर्व शिक्षकांसाठी आदर्शवत असल्याचे गौरवदगार माजी शिक्षण मंत्री बाळासाहेब थोरात यांनी काढले आहे.

> सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांनी सह्याद्री शिक्षण संस्थेची स्थापना ही सामाजिक चळवळ म्हणून केली आहे. बहुजन समाजाला पुढे न्यायचे असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही, असे सांगताना या क्षेत्रात काम करणाऱ्या प्रत्येकाने सामाजिक चळवळीतून आलेला कार्यकर्ता म्हणून सेवाभावी पणे काम केली पाहिजे. कामाला ईश्वर मानून समर्पित भावनेने के.जी खेमनर यांनी काम केले आहे गणित आणि विज्ञान हे अत्यंत महत्त्वाचे विषय असून या विषयांमध्ये विद्यार्थ्यांना चांगले ज्ञान मिळावे याकरता त्यांनी अधिक प्रयत्न केले.
>
> **– सुधीर तांबे, माजी आमदार**



सिद्धिविनायक लॉन्स येथे सह्याद्री विद्यालय व ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य के. जी. खेमनर यांच्या सेवानिवृत्ती सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी अध्यक्षस्थानी माजी आमदार डॉ. सुधीर तांबे हे होते.

यावेळी दुर्गाताई तांबे, रणजितसिंह देशमुख, पुष्पाताई खेमनर, लक्ष्मणराव कुटे, शंकरराव खेमनर, चंद्रकांत कडलग, बाळासाहेब गायकवाड, प्रा. बाबा खरात, ॲड. लक्ष्मण खेमनर, विक्रम थोरात, रावसाहेब खेमनर, उमेश डोंगरे, उपप्राचार्य संजय सुरसे, एस. एम. खेमनर, एम. वाय. दिघे, सुरेखा दिघे यांच्यासह आदी उपस्थित होते.

यावेळी सह्याद्री संस्थेतील शिक्षकांच्या वतीने विठ्ठल रुक्मिणीची मूर्ती मानपत्र व सन्मानचिन्ह देऊन खेमनर दाम्पत्याचा सत्कार करण्यात आला.

माजी मंत्री थोरात म्हणाले की, अत्यंत प्रामाणिक आणि निष्ठेने के. जी. खेमनर यांनी आपली सेवा दिली आहे. प्रत्येकाने जर जबाबदारीने आणि प्रामाणिकपणाने काम केले. तर देशाची खऱ्या अर्थाने प्रगती होईल. कारगिल विजय दिवस आपण साजरा करत आहोत प्रत्येकाने जबाबदारीने काम करा तीच खरी देश सेवा ठरणार आहे.

---

# दाखला

खर्डा पोलीस स्टेशन,
ता.जामखेड, जि.अहमदनगर
दि.२२/०७/२०२५

दाखला देण्यात येतो की, श्री.सोनवणे अश्विनी सोनीनाथ वय ३१, रा.गवलवाडी, ता.जामखेड, जि.अहिल्यानगर यांनी त्यांचे नावावर कागदपत्र नं.१. शाळा सोडल्याचा दाखला २. मार्कसीट (बी.ए.) हे खर्डा शहरात शिवारात कोठेतरी गहाळ झालेले आहेत.

याबाबत त्यांनी इकडील पोलीस स्टेशनला गहाळ बाबात अर्ज दिल्याने खर्डा पोलीस स्टेशन प्रॉ.मि.रजि. नं. ८९/२०२५ दि.२२/७/२०२५ रोजी दाखल करण्यात आली आहे. तरी खर्डा शहरात यांचा आज पावेतो पोलीस मार्फत शोध घेतला असता मिळून आलेला नाही. तरी सदरचा दाखला हा अर्जदार यांचे मागणीवरून देण्यात आलेला आहे. दाखला ठेवून काम परत करीत आहोत.


**ठाणे अंमलदार**
**खर्डा पोलीस स्टेशन,**
**ता.जामखेड, जि.अहमदनगर**




# पन्नाशीनंतर काळजी घ्या

**व्याधी विचार**

प्रोस्टेट हा पुरूषांच्या शरीरातला अत्यंत महत्त्वाचा अवयव आहे. मात्र विशिष्ट वयानंतर प्रोस्टेट ग्रंथींचा आकार वाढू लागतो आणि याची परिणती प्रोस्टेट ग्रंथींच्या कॅन्सरमध्ये होते. पुरूषांमध्ये प्रोस्टेट कॅन्सरचं प्रमाण बरंच जास्त आहे. या विकाराला बऱ्याच बाबी कारणीभूत ठरतात. प्रोस्टेट कॅन्सरची वाढ मंद गतीने होत असल्यामुळे सुरूवातीच्या टप्प्यात त्याची लक्षणं लक्षात येत नाहीत. चुकीची जीवनशैली आणि आहाराच्या चुकीच्या सवयी प्रोस्टेट कॅन्सरला कारणीभूत ठरतात. जीवनशैलीत काही बदल करून प्रोस्टेट कॅन्सरचा धोका कमी करता येऊ शकतो. सर्वसाधारणपणे पन्नाशीनंतर पुरुषांमध्ये प्रोस्टेट कॅन्सरचा धोका वाढतो. पण सध्याच्या धकाधकीच्या काळात कमी वयाच्या पुरुषांनाही हा विकार जडू शकतो. प्रोस्टेट कॅन्सरच्या वाढीच्या कारणांची ही चर्चा...




वाढतं वय हे प्रोस्टेट कॅन्सरचं सर्वात महत्त्वाचं कारण ठरतं. पन्नाशी ओलांडलेल्या पुरुषांमध्ये हा कॅन्सर झपाट्याने पसरतो. त्यामुळे विशिष्ट वयानंतर पुरुषांनी प्रोस्टेट कॅन्सरची तपासणी करून घ्यायला हवी. जनुकीय कारणांमुळेही हा विकार होऊ शकतो. कुटुंबात प्रोस्टेट कॅन्सरचा इतिहास असेल तर पुरुषांनी विशेष काळजी घ्यायला हवी. आहाराच्या चुकीच्या सवयीही प्रोस्टेट ग्रंथींच्या वाढीला कारणीभूत ठरत आहेत. जंक फूड, लाल मांस, मेदयुक्त दुग्धजन्य पदार्थांच्या अतिसेवनामुळे प्रोस्टेट ग्रंथींचा कॅन्सर होऊ शकतो. स्थूलत्व हे अनेक विकारांचं मूळ असू शकतं.

# गोड न खाताही होऊ शकतो मधुमेह



**आरोग्य विशेष**

**डॉ. अजिंक्य बोऱ्हाडे**

मधुमेह हा एक जुनाट आजार असून त्यावर कोणताही इलाज नाही. केवळ आहार आणि जीवनशैली सुधारुन तो नियंत्रित वा रोखला जाऊ शकतो. या आजाराबद्दल अनेकांच्या मनात गैरसमज आहेत. बऱ्याच लोकांना वाटते की मधुमेह फक्त जास्त साखर किंवा गोड खाणाऱ्या लोकांना होतो. मात्र टाइप २ मधुमेह जास्त साखर खाल्ल्याने होतोच असे नाही. रक्तात जास्त साखर असणे हे टाइप २ मधुमेहाचे लक्षण आहे; परंतु जास्त साखर खाणे हे रोगाचे मुख्य कारण असेलच असे नाही.

**मधुमेह का होतो?**

टाइप २ मधुमेहाचे मुख्य कारण इन्सुलिन प्रतिरोध हे आहे. यकृतामध्ये तसेच स्नायूंच्या पेशींमध्ये फॅटी ॲसिड तयार झाल्यामुळे इन्सुलिनला प्रतिकार होतो. ते इन्सुलिन रिसेप्टर्सला ब्लॉक करतात. त्यामुळे तेथे इन्सुलिन रक्तातून ग्लुकोज पेशींमध्ये प्रभावीपणे आणू शकत नाही. त्यामुळे रक्तातील साखर वाढते. इन्सुलिनच्या प्रतिकाराचे तीन मुख्य घटक असून त्यात शारीरिक हालचालींचा अभाव, अतिप्रमाणात चरबीयुक्त पदार्थ खाणे आणि जास्त कॅलरीयुक्त पदार्थांचे सेवन याचा समावेश होतो.

**मधुमेह टाळण्यासाठी काय करावे?**

टाइप २ मधुमेह लठ्ठपणा, शारीरिक निष्क्रियता आणि अनुवांशिक कारणांमुळेही होऊ शकतो. कोणी जास्त चरबीयुक्त पदार्थ खात असेल किंवा वजन जास्त असेल तर तो साखर टाळतो. परंतु तरीही त्याला मधुमेहाचा धोका असतो कारण यामुळे इन्सुलिन डिस्चार्ज कमी होतो आणि इन्सुलिन प्रतिरोधक क्षमता कमी होते. याव्यतिरिक्त, शरीरात विशेषत: व्हिसेरल फॅट असल्यास मधुमेहाचा धोका वाढतो. अशा परिस्थितीत, इन्सुलिन चरबीच्या पेशींमध्ये जमा होते. वजन कमी केल्याने हे इन्सुलिन पुन्हा रक्ताभिसरणात आणण्यास मदत होते. त्यामुळे मधुमेह सुधारण्यासही मदत होते. त्याचप्रमाणे, तणाव आणि कमी झोपेमुळे हार्मोनल संतुलन आणि चयापचय विस्कळीत होते आणि रक्तातील साखरेचे प्रमाण वाढते.

**काय करावे, काय करू नये?**

शारीरिकदृष्ट्या सक्रिय नसणे, वाढते वय आणि बरीच औषधे घ्यावी लागणे, विशेषत: स्टिरॉइड्स आणि काही अँटीडिप्रेसेंट्सचे सेवन, जास्त साखर खाणे यामुळेही मधुमेहाचा धोका वाढू शकतो. त्यामुळे आहाराकडे लक्ष देणे सर्वात महत्त्वाचे आहे. हा धोका टाळण्यासाठी ताजी आणि ऋतूनुसार उपलब्ध असणारी फळे, भाज्या, संपूर्ण धान्य, कडधान्ये, मसूर आणि बिया खाव्यात आणि जंक, प्रक्रिया केलेले पदार्थ, तेलकट गोष्टी टाळल्या पाहिजेत. रोज किमान ४५ मिनिटे व्यायाम, योगा आणि ध्यान केल्याने खूप आराम मिळतो. हा धोका टाळण्यासाठी तणावापासून दूर राहून आठ तास चांगली झोप घेतली पाहिजे.

# लहान मुलांमध्ये कर्करोगाचा धोका

**आरोग्यभान**

**डॉ. प्रसन्न नेने**

लहान मुलांमध्ये कर्करोगाचा धोका वाढत असल्याची बाब समोर आली आहे. मुंबईतील टाटा मेमोरियल हॉस्पिटल (टीएमएच) आणि खारघर येथील ॲडव्हान्स्ड सेंटर फॉर ट्रीटमेंट, रिसर्च अँड एज्युकेशन इन कॅन्सर (एसीटीआरईसी) येथील बाल कर्करोग उपचार संस्थांमध्ये गेल्या पाच वर्षांत कर्करोगाच्या प्रकरणांमध्ये दोन टक्के वाढ झाल्याचे स्पष्ट केले आहे.

मुंबई, बनारस, गुवाहाटी, विशाखापट्टणम, संगरूर, मुझफ्फरपूर येथील या सर्व केंद्रांमध्ये २०१९ मध्ये २,९८१ मुलांची उपचारांसाठी नोंदणी करण्यात आली होती. २०२४ मध्ये ३,८७४ मुलांची नोंदणी झाली होती. याचा अर्थ असा, की गेल्या पाच वर्षांत नोंदणीमध्ये ३० टक्के वाढ झाली आहे. त्याच वेळी, इतर राज्यांमध्ये स्थापन झालेल्या टाटा केंद्रांमध्ये नोंदणींची संख्यादेखील वाढली आहे.

'इंडियन कॅन्सर सोसायटी'च्या मते, देशात दरवर्षी अंदाजे ५० हजार मुले कर्करोगाने ग्रस्त असतात. अर्थात मुलांमध्ये कर्करोगाच्या उपचारांमुळे उत्कृष्ट परिणाम मिळतात. रोग लवकर ओळखला गेला आणि उपचार दिले गेले तर ते बरे होतात.

टाटा मेमोरियल सेंटरच्या विस्तारामुळे या रुग्णांना फायदा होत आहे. काही वर्षांपूर्वीपर्यंत रुग्णांना उपचारासाठी मुंबईला यावे लागत होते; परंतु इतर राज्यांमध्ये टाटा सेंटर्स उघडल्यामुळे मुंबईसह त्या सेंटर्समध्ये रुग्णांची संख्या वाढत आहे. टाटा मेमोरियल सेंटरकडून मिळालेल्या आकडेवारीनुसार, २०१९ मध्ये मुंबईत २०८९ कर्करोगग्रस्त मुलांनी नोंदणी केली होती तर २०२४ मध्ये २,१३१ नवीन रुग्णांची नोंदणी झाली.

टाटाच्या इतर पाच केंद्रांमध्ये २०१९ मध्ये ८९२ रुग्णांची नोंदणी झाली आणि २०२४ मध्ये नोंदणीची ही संख्या १७४३ पर्यंत पोहोचली. याचा अर्थ असा, की मुंबईत उपचार घेणाऱ्यांची संख्या पाच वर्षांत दोन टक्क्यांनी वाढली आहे आणि इतर पाच केंद्रांमध्ये ९५ टक्क्यांनी वाढली आहे.



रक्ताच्या कर्करोगाने ग्रस्त असलेल्या मुलांना उपचारानंतर खूप चांगले परिणाम मिळत आहेत. सुमारे ८० टक्के रुग्ण बरे होतात. त्याच वेळी, कर्करोगाच्या ट्यूमरने ग्रस्त असलेल्या ७० टक्के मुलांमध्ये हा आजार बरा होतो तर ३० टक्के मुलांमध्ये पुन्हा कर्करोग होतो.

या पार्श्वभूमीवर लक्षणे तपासणे गरजेचे आहे. एखाद्या मुलाला दोन आठवड्यांपेक्षा जास्त काळ ताप येत असेल, वजन कमी होत असेल, थकवा जाणवत असेल, भूक लागत नसेल, रक्तस्त्राव होत असेल तर ही रक्त कर्करोगाची लक्षणे असू शकतात. 'ब्रेन ट्यूमर'मुळे बराच काळ डोकेदुखी, उलट्या, चक्कर येणे, हाडांमध्ये वेदना होतात. अशावेळी तपासणी करणे आवश्यक आहे.

आज कर्करोगाने कर्करोगाने ग्रस्त असणाऱ्या २५ टक्के मुलांना ल्युकेमियाचा त्रास आहे. हा पांढऱ्या रक्त पेशींचा कर्करोग आहे. तो अस्थिमज्जामध्ये तयार होणाऱ्या रक्तपेशींवर परिणाम करते. २५ टक्के मुलांना ब्रेन ट्यूमरचा त्रास आहे. यर्चीं मेंदूमध्ये कर्करोगाची गाठ तयार होते.

२० टक्के मुले लिम्फोमाने ग्रस्त असल्याचे आढळून येते. हा रक्त कर्करोगाचा एक प्रकार आहे जो लसीका प्रणालीवर परिणाम करतो. तर दहा टक्के मुलांना हाडांच्या गाठींचा त्रास आहे. म्हणजेच हा कर्करोग हाडांमध्ये होतो. इतर ट्यूमर १० टक्के आढळतात. याचा अर्थ असा की शरीराच्या कोणत्याही भागात कर्करोगाची गाठ तयार होऊ शकते.

# प्राण्यातूनही कोरोनाचा धोका

**नोंद घ्यावी**

**डॉ. कुंदन गायकवाड**

चीनमधील एका संशोधन पथकाला अलिकडेच नवा कोरोना विषाणू सापडला. माणसाला प्राण्यामधून या विषाणूचा संसर्ग होण्याचा धोका आहे. याबाबतचा अभ्यास आणि संशोधन शी झेंगली यांनी केले आहे. कोरोना विषाणूवरील व्यापक संशोधनामुळे त्यांना 'बॅटवुमन' म्हणून ओळखले जाते.

वुहान विद्यापीठ आणि 'वुहान इन्स्टिट्यूट ऑफ व्हायरोलॉजी'च्या संशोधकांसह त्या काम करतात. वुहान शहरातील प्रयोगशाळेतून कोरोना विषाणू लीक झाल्याचे आरोप यापूर्वी झाले होते. कोरोना कुठून आणि कसा आला याबाबत अद्याप ठोस माहिती नसली, तरी काही अभ्यासकांनी हा विषाणू वटवाघळांमधून आला असल्याचे सांगितले होते. दरम्यान, 'वुहान इन्स्टिट्यूट' कोरोनाच्या उद्रेकासाठी जबाबदार नसल्याचे शी झेंगली यांनी म्हटले आहे.




जपानी वटवाघळांत विषाणू

'साऊथ चायना मॉर्निंग साऊथ पोस्ट'च्या अहवालानुसार, संशोधनात म्हटले आहे की, 'एचकेयू५' हा नवीन प्रकारचा कोरोना विषाणू आहे. हाँगकाँगमधील जपानी पिपिस्ट्रेल वटवाघळांमध्ये हा विषाणू प्रथम आढळला होता. तो 'मर्बेकोवायरस सबजीन'पासून उद्भवतो. यामध्ये 'मिडल इस्ट रेस्पिरेटरी सिंड्रोम' (एमईआरएस) पासून होणाऱ्या विषाणूचा समावेश आहे. हा विषाणू 'एसीई २' रिसेप्टरशी संबंधित आहे. तो कोविड-१९ विषाणूद्वारे पसरला जातो. संशोधकांचे म्हणणे आहे की, हा विषाणू मानवांमध्ये पसरण्याचा धोका जास्त आहे; मात्र कोविड १९ प्रमाणे धोकादायक नाही.

संशोधकांच्या मते 'एचकेयू५' केवळ वटवाघुळांपासून वटवाघळांमध्येच नव्हे तर मानव आणि इतर सस्तन प्राण्यांमध्येही सहज पसरू शकतो. संशोधकांना असे आढळून आले की, विषाणूंना नमुन्यांमधून वेगळे केले गेले, तेव्हा ते कृत्रिमरित्या वाढलेल्या पेशी तसेच मानवी पेशींना संक्रमित झाले.

शी झेंगली यांच्या टीमला आढळले आहे की, 'एचकेयू ५' आणि आंतरप्रजाती संसर्गाची शक्यता जास्त असू शकते. अशा परिस्थितीमध्ये या विषाणूवर अधिक लक्ष ठेवण्याची गरज आहे. दरम्यान, त्यांच्या टीमने स्पष्ट केले आहे की, त्याची कार्यक्षमता कोविड १९ विषाणूपेक्षा खूपच कमी आहे आणि 'एचकेयू५'कडे मानवाने धोका म्हणून पाहू नये.

# नैराश्याच्या गर्तेत ?



**खास बात**

सध्याच्या धकाधकीच्या आणि स्पर्धात्मक युगात प्रत्येकावर ताणाने कुरघोडी केली आहे. आज मानसिक आणि शारीरिक ताणतणावांपासून कोणीही लांब राहिलेलं नाही. आयुष्यातल्या वाढत्या अपेक्षा पूर्ण करताना प्रत्येकाला कधी ना कधी हरल्यासारखं, थकल्यासारखं वाटतं, आयुष्यात काहीच उरलेलं नाही अशी भावना निर्माण होते. ताणामुळे दैनंदिन आयुष्यातली कामं करताना अडचणी येतात. या स्थितीला नर्व्हस ब्रेकडाऊन असं म्हटलं जातं. नर्व्हस ब्रेकडाऊन हा वैद्यकीय शब्द नाही. मात्र नैराश्य, पोस्ट ट्रॉमेटिक स्ट्रेस डिसऑर्डरसारख्या मानसिक विकारांचे परिणाम विषद करण्यासाठी या शब्दाचा वापर केला जातो.

नर्व्हस ब्रेकडाऊन हा वैद्यकीय शब्द नसल्यामुळे याची लक्षणं व्यक्तिनुसार आणि त्याच्या मानसिक स्थितीनुसार बदलत रहातात. मात्र याची काही सर्वसाधारण लक्षणं असतात. सतत अस्वस्थ वाटणं, नैराश्य, भीतीची भावना वाढीस लागणं, झोपेत अडथळे येणं, आहाराच्या सवयींमध्ये बदल होणं, एकाग्रता भंग पावणं, मनात आत्महत्येचे विचार येणं, मूड बदलत रहाणं, श्वास घ्यायला त्रास होणं, छातीत दुखणं, चक्कर येणं, पोट बिघडणं, सामाजिक कार्यक्रमांमध्ये सहभागी न होणं, एकटं रहाणं ही नर्व्हस ब्रेकडाउनची काही लक्षणं आहेत.

नर्व्हस ब्रेकडाऊनची बरीच कारणं असतात. प्रचंड ताण आणि दबावामुळे माणूस नैराश्याच्या गर्तेत जाऊ शकतो. जवळच्या व्यक्तीचा अचानक झालेला मृत्यू माणसाला निराश करून सोडतो. सततचा कामाचा ताण, आर्थिक चणचण, जबाबदाऱ्यांचं ओझं, अभ्यासाचा ताण, शारीरिक आणि मानसिक त्रास अशा असंख्य बाबी नर्व्हस ब्रेकडाऊनला कारणीभूत ठरू शकतात.

नर्व्हस ब्रेकडाउन किंवा इतर कोणत्याही मानसिक विकारावर उपचार आहेत. रुग्णाची मानसिक स्थिती आणि लक्षणं यावर उपचारांची दिशा ठरते. उपचारांची पद्धत व्यक्तिनुसार बदलत रहाते. लक्षणांनुसार डॉक्टर समुपदेशन किंवा सायकोथेरेपीचा सल्ला देतात. काही औषधंही लिहून दिली जातात. यात नैराश्य कमी करणाऱ्या औषधांचा समावेश असतो.

जीवनशैलीतले काही बदलही नर्व्हस ब्रेकडाऊन, नैराश्य, ताण अशा मानसिक आजारांना आळा घालू शकतात. हा त्रास कमी करण्यासाठी वादविवाद लवकर सोडवण्याचा प्रयत्न करा. शरीरासोबतच मनाला आराम देणारे योगा, मेडिटेशन, दीर्घ श्वसन असे व्यायाम नियमितपणे करा. दररोज किमान ३० मिनिटं व्यायाम केल्याने बराच फरक पडू शकतो. घराबाहेर पडा, आवडीच्या गोष्टी करा. एकटेपणामुळे नैराश्यात वाढ होऊ शकते. त्यामुळे वेगवेगळ्या लोकांशी संवाद साधा, सामाजिक उपक्रमांमध्ये सहभागी व्हा. झोपण्याच्या वेळा निश्चित करा. सकस आहार घ्या. अल्कोहोल, कॅफेन यांचं सेवन कमी प्रमाणात करा. काही कारणांमुळे आयुष्यात नैराश्याचे प्रसंग येतात. पण याचा अर्थ तुम्ही नर्व्हस ब्रेकडाऊनला बळी पडला आहात असा होत नाही. त्यामुळे लक्षणं जाणून मगच उपचार करा.

# मध्यरात्री भूक लागते?

**लाईफस्टाईल**

रात्री झोपण्याच्या किमान दोन तास आधी जेवावं, असा सल्ला नेहमीच दिला जातो. मात्र काम किंवा इतर कारणामुळे होणारं जागरण, लवकर जेवणं यामुळे रात्री उशिरा भूक लागू शकते. अशा वेळी वेफर्स, चॉकलेट्स, आईस्क्रीमसारखे अनारोग्यदायी पदार्थ खाल्ले जातात. मात्र रात्री भूक लागल्यानंतर खाता येणारे काही आरोग्यदायी पदार्थही आहेत. अशा पदार्थांमुळे तुमच्या कॅलरीही वाढणार नाहीत आणि रात्री त्रासही होणार नाही. कोणते आहेत हे पदार्थ? जाणून घेऊ.



तुम्ही मध्यरात्री विविध प्रकारच्या बिया आणि सुका मेवा हे मिश्रण खाता येईल. यात भरपूर पोषणमूल्य असतात. मात्र हे पदार्थ मर्यादित प्रमाणात खायला हवेत. रात्रीच्या वेळी उकडलेलं अंडंही चालून जाईल. एका मध्यम आकाराच्या उकडलेल्या अंड्यात फक्त ७८ कॅलरी असतात. तसंच अंडं हा प्रथिनांचाही स्रोत आहे. त्यामुळे रात्रीच्या वेळी अंडं खाता येईल. फायबरयुक्त ओट्समुळे पोट बराच काळ भरलेलं रहातं. यातल्या पोषणमूल्यांमुळे तुम्हाला छान झोपही लागेल. वेगळा पदार्थ म्हणून तुम्ही पॉपकॉर्नही खाऊ शकता.

# योगा करताना चुका टाळा

**कुठे चुकतो?**

योगासनांमुळे आरोग्य उत्तम रहायला मदत होत असली तरी ही आसनं योग्य पद्धतीने करणंही गरजेचं असतं कारण योगासनं करताना होणाऱ्या काही चुकांमुळे त्रास होऊ शकतो. त्यातही नवखे असताना बरीच काळजी घ्यावी लागते. नवख्यांनी योगा क्लासमध्ये पहिल्या रांगेत बसण्याऐवजी शक्यतो मागे बसावं. यामुळे योगा प्रशिक्षकांच्या सूचनांकडे नीट लक्ष ठेवता येईल. दुसरं म्हणजे क्लासमधल्या इतरांची कृतीही न्याहाळता येईल.



काहीजण श्वास जास्त वेळ रोखून धरतात. पण हे चुकीचं आहे. ३० सेकंदांपेक्षा जास्त वेळ श्वास रोखून धरू नये. श्वास जास्त काळ रोखून धरल्यामुळे शरीरातल्या ऑक्सिजनच्या प्रवाहावर परिणाम होऊन घुसमटल्यासारखं वाटू शकतं. योगा करताना शरीराची स्थिती योग्य असणंही तितकंच गरजेचं आहे.

बसण्याच्या चुकीच्या पद्धतीमुळे योगाचे काहीच लाभ मिळणार नाहीत. शिवाय इतर दुखणी मागे लागू शकतात. अखेरच्या टप्प्यात शवासन केलं जातं. यामुळे योग केल्यानंतर शरीराला आराम मिळतो. म्हणूनच शवासन टाळू नये.

महत्त्वाचे म्हणजे भरल्या पोटी योगा करू नये.

# स्मरणशक्ती सुधारायची तर...

**आयुर्वेद आणि विकार**

स्मरणशक्ती टिकून रहावी असं प्रत्येकालाच वाटत असतं. पण सध्याच्या काळात अनेक कारणांमुळे विस्मरणाचं प्रमाण वाढत चाललं आहे. तल्लख बुद्धीसाठी तसंच स्मरणशक्ती टिकवून ठेवण्यासाठी काही आयुर्वेदिक औषधी उपयुक्त ठरू शकतात. अशाच काही औषधींविषयी...

*ब्राह्मी हा स्मरणशक्ती सुधारण्याचा रामबाण उपाय आहे. गुणधर्मामुळे ब्राह्मीवर बरंच संशोधनही झालं आहे. ब्राह्मीच्या सेवनाने मेंदूची क्षमता सुधारते. यासोबतच या औषधामुळे मेंदू ताजातवाना होतो. आपल्याला खूप शांत वाटतं. ताण कमी करण्यासाठीही ब्राह्मीचा वापर करता येईल.

*जिंको नामक आयुर्वेदिक औषधावर बरंच संशोधन करण्यात आलं आहे. जिंकोमुळे मज्जासंस्थेचं रक्ताभिसरण सुधारून मेंदूला चालना मिळते. यासोबतच हे औषध शरीरातल्या विविध पेशींना झालेलं नुकसानही भरून काढतं.

*अश्वगंधामुळेही मेंदूची सर्वांगिण कार्यक्षमता वाढते



आणि स्मरणशक्तीही सुधारते.

*ज्येष्ठमधही मेंदूच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त औषध आहे. ज्येष्ठमधाच्या सेवनानंतर आपल्याला खूप शांत वाटतं. ताण, चिंता, काळजी अशा मानसिक आजारांवरही ज्येष्ठमध उपयुक्त ठरतो. त्यामुळे ज्येष्ठमधाचं नियमित सेवन करायला हवं.

हे दैनिक जनता आवाज मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक अजित रमेश मोरे यांनी जनता आवाज प्रेस गट नं. २५/१/२/३, कोल्हार बु., ता. राहाता, जि. अहिल्यानगर ४१३७१० येथे छापून दैनिक 'जनता आवाज', मु.पो. कोल्हार बु., ता. राहाता जि. अहिल्यानगर, ४१३७१० जिल्हा कार्यालय- गाळा नं.१, विवेकानंद पॅलेस, श्रीराम चौक, बोल्हेगाव, अहिल्यानगर ४१४१११. (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. विभागीय कार्यालय- जिजामाता चौक, सोमैय्या हायस्कूल शेजारी, व्यापारी संकुल बिल्डींग, दुसरा मजला, ता. श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर, ४१३ ७०९, * कार्य. संपादक : महेश पोपट रक्ताटे. पोस्टल परवाना क्र. SRP/141/2025-2028/ PRGI No. MHMAR/25/RAA11. This daily Janta Awaj is published by Ajit Ramesh More, owner, printer, publisher and editor at Janta Awaj Press Gut No. 25/1/2/3, Kolhar Bk., Tal.- Rahata, Dist.- Ahilyanagar-413710. Published at District Office- Shop No.1, Vivekanand Palace, Shriram Chowk, Bolhegaon, Ahilyanagar-414111. Divisional Office-Jijamata Chowk, Near Somaiyya High School, Business Complex Building, 2nd Floor, Tal.-Shrirampur, Dist. -Ahilyanagar-413709
* Executive Editor- Mahesh Popat Raktate. Postal License Number-SRP/141/2025-2028 PRGI No.- MHMAR/25/RAA11